# सारस्वत चैतन्य

वर्ष : ३९ । अंक : १ । मुंबई । एप्रिल–जून २०२४ । एकूण अंक क्र. : १५३ । पाने : ५२ । किंमत २० रुपये

Year : 39 | Issue : 1 | Mumbai | April-June 2024 | Total Issue no. : 153 | Pages : 52 | Price 20 Rupees




भारतातील आणि परदेशातील शिक्षणासाठी विद्यार्थी अनुकूल
शैक्षणिक कर्ज
9.00 % p.a.
( विद्यार्थिनींसाठी )
9.25 % p.a.
( सामान्य )
*अटी व नियम लागू
■ रुपये १.५० कोटीं पर्यंत कर्ज
■ मोरॅटॉरियम सुविधा उपलब्ध
■ प्री-पेमेन्ट शुल्क नाही
For Premier Institute -
IIT , IIM ,IISC & ISB-
व्याजदरात 0.25% सवलत.
Tax Benefit on Interest paid on
Education Loan
u/s 80E of Income Tax Act, 1961.
कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी
तुमच्या जवळच्या शाखेस भेट द्या
किंवा 022 28602020 वर मिस्ड कॉल द्या.
www.nkgsb-bank.com
NKGSB Co-operative
Bank Ltd. (Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
106
YEARS OF
BANKING EXCELLENCE

सारस्वत
ब्राह्मण समाज

# सारस्वत ब्राह्मण समाज

(स्थापना गुढीपाडवा १८९६)

(सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र. ई-२२१४८ मुंबई)

मधुकोष, पहिला मजला, शं. वि. सोवनी पथ,
गिरगाव, मुंबई-४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८६२२६९
Email : saraswatbrahmansamaj@gmail.com

## संस्थेचे उपक्रम

सोमवार ते शुक्रवार, सकाळी १० ते १२ शिशुमंदिर

सोमवार ते शनिवार, दुपारी १२ ते ४ फॅशन डिझायनिंग

सायंकाळी ६ ते ८.३० वाचनालय

सायंकाळी ६ ते ८.३० वधूवर सूचक मंडळ

सोमवार, बुधवार व शनिवार सायंकाळी ५.३० ते ९ बॉलीवूड नृत्यकलेचे वर्ग.

मंगळवार व गुरुवार ५.३० ते ९ कथ्थक नृत्यकलेचे वर्ग

दुपारी ४ ते ५.३० योगविद्या

दर बुधवारी रात्री ९.३० ते १०.३० उपासना


उत्सव निसर्गाचा,
श्वास सुखाचा
गोव्यातील सुखसमृद्धीला,
वरदहस्त मंगेशाचा!
देखणा निसर्ग
प्रदूषणमुक्त हवा
उत्कृष्ट बांधकाम
मुबलक पाणी
मंगेशीचा मंगेश,
मारदोळची म्हाळसा,
वेलिंगचा नृसिंह,
मडकईची नवदुर्गा
अशा अतिशय प्रसिद्ध
मंदिरांच्या सान्निध्याने
पवित्र झालेला परिसर
सुखसमृद्धी
मंगेशीच्या देवळापासून दोन मिनिटांच्या अंतरावर
मंगेशी, फोंडा - गोवा
फ्लॅट्स उपलब्ध :
१ रूम किचन,
१ बी.एच.के.,
२ बी.एच.के.
प्रोजेक्ट मान्यता :
गोवा टाउन प्लॅनिंग
कर्ज सहाय्य :
नामवंत वित्त संस्था
A project by:
KCC
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
संपर्क : मुंबई - कल्पना केरकर : 9820933352 • जितेंद्र वैती : 9833636451
Airtel Landline +91 22 40153980 • Email : kunalconstructiongoa@yahoo.in • Web : www.kccgoa.in
गोवा - नरेश केरकर : 9422639188 • के. विनोद : 9975975782, 8698269174

श्रद्धाच तुझी कवळील विश्वबंधुत्व

# सारस्वत चैतन्य

वर्ष : ३९ । अंक : १ । एप्रिल-जून २०२४ । एकूण अंक क्र. : १५३

Year : 39 | Issue : 1| April-June 2024 | Total Issue no. : 153



**कै. प्रफुल्लदत्त**
संस्थापक-संपादक
(१९८६-१९८७)



**कै. रवींद्र पाटकर**
संपादक
(१९८७-२०१०)

**संपादक :**
सुधाकर लोटलीकर

**विश्वस्त मंडळ**

**अध्यक्ष :**
दिलीप भिसे

**कार्याध्यक्ष :**
राजेंद्र देसाई

**कार्यवाह :**
राहुल साखळकर

**संयुक्त कार्यवाह :**
प्रसाद कुलकर्णी

**कोषाध्यक्ष :**
दीपक मुळ्ये

**विश्वस्त :**
प्रमोद तेंडुलकर । सुधाकर लोटलीकर
नीलेश रांगणेकर । मयुरेश पाडगांवकर

www.saraswatprakashan.org
Email : Chaitanyamag@gmail.com

**देणगी**

हितचिंतक : ३,५००/-
आश्रयदाता : ६,०००/- । आधारस्तंभ : १०,०००/-
(अधिक माहितीसाठी अंकातील निवेदन पाहावे.)
**देणगीदार, जाहिरातदारांना विनामूल्य अंक**

**: पत्रव्यवहाराचा पत्ता :**
सारस्वत प्रकाशन, सारस्वत भवन, दुसरा मजला, खोली नं. १०,
छत्रपती शिवाजी महाराज पथ (मोगल लेन), माहीम (पश्चिम),
मुंबई - ४०० ०१६
संपर्क : सोमवार ते शनिवार, सायंकाळी ५ ते ७ (मो. ८७७९७५८०८५)

**- या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही -**

# आधारस्तंभ

## व्यक्ती

- श्री. रघुवीर सीताराम मंत्री
- श्री. प्रकाश दामोदर कामत
- डॉ. प्रेमानंद भि. पै-धुंगट
- श्री. मंगेश रंगनाथ भांडारकर
- श्री. हेमंत शरद पै
- श्री. सुबोध आर. नेमळेकर
- श्रीमती स्नेहलता कुळकर्णी
- सौ. अरुंधती अ. किनरे
- डॉ. गुरुकुमार भालचंद्र परुळकर
- डॉ. प्रेमानंद शांताराम रामाणी
- सौ. प्रतिमा प्रेमानंद रामाणी
- श्री. नाथ रामानंद लाड
- श्री. शशिकांत गोविंद तोरणे
- श्री. अजित एन. गुंजीकर
- श्रीमती उर्मिला उमेश कोचरेकर
- श्री. श्रीकांत नरहरी वागळे
- श्री. सुरेश यशवंत कावतकर
- श्री. सुरेश बोरकर
- श्री. केशव गुरुनाथ शेटे
- श्री. मोरेश्वर महादेव सबनीस
- डॉ. शरदचंद्र एस. गायतोंडे
- श्रीमती सीमा लक्ष्मीकांत नेरुरकर
- श्री. रमेश भट
- श्री. किशोर गुरुदास मासुरकर
- श्री. श्याम शंकर कुळकर्णी
- श्री. भालचंद्र महादेव उर्फ दीपक पिंगे
- श्री. अजित सत्येंद्रनाथ रेगे
- ॲड. समीर मनोहर तेंडुलकर
- डॉ. वामन शांताराम खटकूळ
- श्री. कृष्णा गजानन तेंडुलकर
- सौ. क्षमा श्रीराम पालेकर
- श्री. अमित अनिल पंडित
- श्री. विश्वास गजानन तेंडुलकर
- श्री. भालचंद्र प्रभाकर जुवळे
- डॉ. हेमंत मधुकर हळदवणेकर
- डॉ. अनुराधा प्रकाश सामंत
- श्री. शशिकांत केशव साखळकर
- श्री पुरुषोत्तम एस. साखळकर

- श्री. केतन यशवंत कामत
- ॲड. प्रसाद ज्ञानेश्वर बोरकर
- श्री. राजेंद्र बाळकृष्ण देसाई
- सौ. विजयालक्ष्मी विष्णू कर्नाटकी
- श्री. गुरुप्रसाद व्ही. सामंत
- श्री. राजेश मेघश्याम नाडकर्णी
- श्री. दीपक भास्कर पंडित
- डॉ. उल्हास रामचंद्र तेंडुलकर
- श्री. सुहास बी. पोतकर
- श्री. सुभाष लक्ष्मण सराफ
- श्री. सुबोध श्रीकांत हरमळकर (संझगिरी)
- सौ. नेत्रा श्रीपाद वैद्य
- श्री. मोहित माणिक भेंडे
- सौ. प्रतिभा विश्वास तेंडुलकर
- श्रीमती अनुराधा अनिल तेंडुलकर
- श्री. राजेंद्र विनायक शिरगावकर
- श्री. अवधूत सी. सुखटणकर
- सौ. शुभांगी अ. सुखटणकर
- श्री. प्रसन्नराज शांताकुमार भांडारकर
- श्री. नागेश पिंगे
- श्री. अवधूत सदाशिव कोटणीस
- श्री. श्रीकांत सदाशिव सिनकर
- श्री. जगन्नाथ मनमोहन प्रभुदेसाई
- श्री. डॉ. श्रीरंग दामोदर बिच्चू
- श्रीमती विजया तेलंग
- श्री. दत्तप्रसाद मनोहर दळवी
- श्री. विकास शंकर तेंडुलकर
- श्री. अद्वैत नीलेश हुन्सवाडकर
- श्री. त्रिंबक मंगेश नाडकर्णी
- श्री. संतोष नाईक

**कुटुंबीय**

- कै. नारायण झांट्ये यांचे कुटुंबीय
- कै. सौ. गीता गोपाळ पालेकर यांचे कुटुंबीय
- कै. डॉ. प्रभाकर वामन रेगे व कै. सौ. प्रमोदिनी प्रभाकर रेगे यांचे कुटुंबीय
- कै. नीला व रामकृष्ण अनंत सबनीस यांचे कुटुंबीय
- कै. व्ही. डी. पाडगावकर आणि पत्नी श्रीमती आशा
- कै. सौ. निर्मला गोविंद वाडेकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. सुलभा व कै. श्री. चंद्रकांत गणेश सुखटणकर यांचे कुटुंबीय
- स्ट्रक्टवेल डिझायनर्स अँड कन्सल्टंट्स संस्था मर्यादित (कै. रमेशचंद्र नारायण रायकर यांच्या स्मरणार्थ)
- प्रमिला दत्ताराम तेंडुलकर (वडील कै. डॉ. सगुण राघोबा रेगे यांच्या स्मरणार्थ)
- कै. श्रीमती साधना धुंडीराज वाकडे यांचे कुटुंबीय
- डॉ. राजीव गुरुनाथ रेडकर (आजोबा कै. आत्माराम श्रीधर रेडकर व आजी कै. नलिनी आत्माराम रेडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ)
- कै. भास्करराव मोरेश्वर कामत यांचे कुटुंबीय
- डॉ. प्रभाकर नारायण कामत (कै. श्री. नारायण विश्वनाथ कामत व श्रीमती इंदिरा नारायण कामत यांच्या स्मरणार्थ)
- श्री. गजानन नारायण डांगी आणि कुटुंबीय
- श्रीमती वैशाली साखळकर (कै. श्रीनिवास भा. साखळकर यांचे स्मरणार्थ)
- कै. श्री. प्रभाकर शामराव कामत व कै. श्रीमती ललिता प्रभाकर कामत यांच्या स्मरणार्थ
- उर्मिला मधुकर चिटणीस (कै. श्री. मधुकर शंकर चिटणीस आणि सौ. गिरिजा मधुकर चिटणीस)
- सौ. अनुराधा उल्हास तेंडुलकर, पूर्वाश्रमीच्या कुमारी कुंदबाला मधुकर हेर्लेकर (वडील कै. मधुकर मोतीराम हेर्लेकर यांच्या स्मरणार्थ
- क्षमा एस. पालेकर (श्रीराम गजानन पालेकर यांच्या स्मरणार्थ)
- वामन मंगेश नाडकर्णी (कै. मंगेश विनायक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ)
- अनिरुद्ध नारायण पंत वालावलकर
- उल्हास रामचंद्र तेंडुलकर (कै. रामचंद्र यशवंत (Ry) तेंडुलकर व कै. सुधा रामचंद्र तेंडुलकर यांच्या स्मरणार्थ)
- सौ. धनश्री सुबोध नेमळेकर (कै. कवी द. वि. तेंडुलकर उर्फ प्रफुलदत्त यांच्या स्मरणार्थ)
- श्रीमती सुनीता रमाकांत कुलकर्णी (कै. श्री. रमाकांत शिवराम कुलकर्णी [मसुरेकर] यांच्या स्मरणार्थ)

**संस्था**

- सारस्वत हितवर्धक मंडळ, माहीम, मुंबई
- सारस्वत ब्राह्मण समाज, गिरगाव, मुंबई

# आश्रयदाते

**व्यक्ती**

- डॉ. राजेंद्र वाय. आंगले
- डॉ. प्रताप बा. मुळगांवकर
- श्री. गुरुनाथ शं. साखळकर
- श्री. शशिकांत ए. तेंडुलकर
- श्री. श्रीधर वामनराव सांखोळकर
- श्रीमती सुरेखा केशव पंडित
- श्रीमती कुमुदिनी इ. नाईक
- श्री. मुकुंद कृष्णाजी सबनीस
- सौ. मीरा व श्री. सीताराम लाड
- श्री. प्रमोद रघुनाथ वकील (नाईक)
- श्री. मोहनदास शानभाग
- श्री. प्रशांत वि. कामत
- डॉ. वामन चिं. पालेकर
- श्री. मिलिंद दिगंबर वरेरकर
- श्री. आत्माराम शांताराम पुनाळेकर
- श्री. भालचंद्र गंगाधर वाकडे
- श्री. व सौ. अनुराधा श्रीकृष्ण दळवी
- श्री. अरविंद यशवंत सबनीस
- सौ. सविता कमलाकर देसाई
- श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण दळवी
- श्री. विनायक कुळकर्णी
- श्री. माधव वसंत देशपांडे
- श्री राजाराम मंगेश सिनकर
- श्री. मोहन रामचंद्र देशपांडे
- सौ. सुनीला एम. रेगे
- श्रीमती रोहिणी कमलनाथ दिवाडकर
- श्री. विश्वनाथ आर. नेरूरकर
- डॉ. विवेक सुधाकर हळदवणेकर
- श्री. शशिधर यशवंत राजाध्यक्ष
- श्री. दामोदर मर्तू नायक
- डॉ. सुरेश वासुदेव दणाईत
- श्री. रमाकांत पां. लोटलीकर
- श्री. दिनकर जयवंत मंत्री
- कु. अनघा प्रणव तेंडुलकर
- डॉ. कल्पा अरविंद पंडित
- श्री. मनीष किशोर वाकडे
- डॉ. संजय लोटलीकर
- श्री. शैलेश लक्ष्मीकांत नेरुरकर
- श्री. संदेश सुरेश सरदार
- श्री. संजीव रामचंद्र तेंडुलकर
- श्री. रवींद्र कृष्णाजी कामत
- सौ. मंगल रमाकांत तेंडुलकर
- श्री. अशोक जनार्दन सिनकर
- ॲड. यशवंत जगन्नाथ कावतकर
- श्री. दिलीप सुंदरराव परुळकर
- श्रीमती निर्मला एन. खानोलकर
- श्री. सुधाकर अच्युत राजाध्यक्ष
- श्री. रमेशचंद्र रघुनाथ तेंडुलकर
- श्रीमती ऋजुता राजन तेरगावकर
- डॉ. करिश्मा प्रसाद बांदिवडेकर
- सौ. राधिका रामदास पत्की
- श्री. कल्याण वर्दे
- श्री. मोरेश्वर एम. वायंगणकर
- श्रीमती माधवी परेश घोलकर
- श्री. उमेश मे. भांगले

- श्री. मंगेश (राजा) दत्तात्रय हळदवणेकर
- श्री. प्रमोद विनायक कामत
- ॲड. देवदत्त अजित साखळकर
- श्री. प्रसन्न मदन सिनकर
- श्री. मंगेश श्रीधर कामत
- श्री. सुचित सुधीर कावतकर
- श्री. दीपक यज्ञेश्वर मुळ्ये
- श्री. आनंद घुर्ये
- श्री. श्रीकांत श्रीराम तेंडुलकर
- श्री. गिरीश ज. महाडदळकर
- श्रीमती पुष्पलता माधव कोटणीस
- श्री. मधुकर हरी नारुरकर
- श्री. विवेक म. लोटलीकर
- श्री. दत्ताराम गोविंद कैसरे
- श्री. रमेश विठ्ठल कामत
- डॉ. यशस्विनी रजनीकांत जनवाडकर
- श्री. सिद्धार्थ लाटकर
- श्री. वामन सुभ्भा प्रभू
- सौ. पूर्णा उदय प्रभू पाटकर
- श्री. भास्कर के. दळवी
- श्री. अशोक केसरीनाथ नाडकर्णी
- श्री. एम. एन. कंटक
- श्री. चंद्रकांत विनायक देसाई
- डॉ. अरविंद दत्ताराम मांजरेकर
- सौ. श्रद्धा आशुतोष कुळकर्णी
- श्री. प्रताप विष्णू तेंडुलकर
- श्री. राजेश चंद्रकांत आजगावकर
- श्री. आनंद प्रभाकर महाजन
- श्री. शैलेश जगन्नाथ तेंडोलकर (वर्दे)
- रेखा सचिन कुंकळ्ळीकर
- पृथा सचिन कुंकळ्ळीकर
- विठ्ठलदास पुंडलिक भट
- श्री. हर्षद अशोक देसाई

## कुटुंबीय

- कै. डॉ. द्वारकानाथ वि. पंडित यांचे कुटुंबीय
- कै. व्ही. एन. व. कै. डब्ल्यू. एस. परुळकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. आशालता चंद्रकांत सिनकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. काशीबाई ऊर्फ मीना नारायण राजाध्यक्ष यांचे कुटुंबीय
- कै. श्रीमती सुमन मधुकर देसाई यांचे कुटुंबीय
- कै. विश्वनाथ वामन नाडकर्णी व
  कै. सौ. अन्नपूर्णा वि. नाडकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. एन. जी. कामत यांचे कुटुंबीय
- कै. एकनाथ व्यंकाजी रांगणेकर आणि
  पत्नी श्रीमती सुनीता
- कै. सौ. केतकी सुरेंद्र मंत्री यांचे कुटुंबीय
- कै. रमाकांत शेषगिरीराव कुळकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. सौ. रमाबाई व वासुदेव रामचंद्र नाडकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. गोपाळकृष्ण द्वारकानाथ गावसकर व
  कै. सौ. नीला गो. गावसकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. सुनंदा (छबी) राजाराम कबे यांचे कुटुंबीय
- कै. श्री. गिरीश शंकर गोठिवरेकर कुटुंबीय
- सौ. उज्ज्वला व श्री. रत्नाकर रामकृष्ण वागळे आणि कुटुंबीय
- श्री. विनोद मधुकर गुळगुळे (पत्नी कै. सौ. विनिता (शैला) विनोद गुळगुळे हिच्या स्मरणार्थ)
- श्री. भालचंद्र सुभाष कामत
  (बंधू कै. विनायक सुभाष कामत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ)
- श्री. गिरीश चंद्रकांत कळसूलकर (कै. सुनंदा व कै. बाळकृष्ण महादेव कळसूलकर यांच्या स्मरणार्थ)
- श्री. विनायक गोविंद कामत
  (कै. गोविंद आनंदराव कामत यांच्या स्मरणार्थ)
- श्री. सुब्राय अच्युत गायतोंडे आणि कुटुंबीय
- श्री. भालचंद्र सुभाष कामत
  (कै. विनायक कामत यांच्या स्मरणार्थ)
- डॉ. मृणाल आणि डॉ. रघुनंदन गोविंद केंकरे तोरसेकर
- विवेक बाळकृष्ण तिनईकर
  (कै. अविनाश बाळकृष्ण तिनईकर यांच्या स्मरणार्थ)
- एन. एस. पै ॲण्ड सन्स, बेळगाव
- शैलेश शरद पोतदार आणि कुटुंबीय

## संस्था

- सारस्वत दीनवत्सल संघ, गिरगाव, मुंबई
- बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण निधी, दादर, मुंबई

# अंतरंग


संपादकीय / ११

चिंतनिका / १२

नव‘वर्षा...’च्या शुभेच्छा! - मयुरेश पाडगांवकर / १४

कोल्हापूरचे वैद्यकीय विश्व -
डॉ. विजय करंडे व डॉ. विनोद घोटगे - अनुराधा तेंडुलकर / २२

सिंधुदुर्गचे माणिकमोती -
पद्मश्री विष्णू उर्फ दादासाहेब नामदेव आडारकर
- डॉ. बाळकृष्ण लळीत / ३०

बांधण आंबेपूरचे रगेल रंगेल आणि रसिक सारस्वत! -
रमेशचंद्र तेंडुलकर / ३४


कल्पनाविलास आणि वास्तव - पुष्पा सामंत / ४०

Global Chamber of Saraswat
Entrepreneurs - Mohit Bhende / 42

**संपादकीय । सुधाकर लोटलीकर**



# बाळ सामंत यांची जन्मशताब्दी



**बाळ सामंत**

अध्यापक, पत्रकार, सरकारी उच्चपदस्थ अधिकारी, व्यासंगी लेखक बाळ गंगाधर सामंत यांचं हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांचा जन्म २७ मे १९२४ रोजी चंदगड येथे झाला. एमए झाल्यावर १९४७ साली त्यांनी रुईया कॉलेजात अध्यापनाला सुरुवात केली. त्यानंतर काही काळ 'लोकमान्य' आणि 'नवभारत' या वृत्तपत्रात उपसंपादक म्हणूनही काम केले. पुढे १९४९ ते १९६५ पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी संचालनालयात उच्च पदावर त्यांनी काम केले. १९६५ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. काही काळ त्यांनी रिलायन्स उद्योग समूहात अध्यक्षांचे सल्लागार आणि जनरल मॅनेजर या पदांचा कार्यभार सांभाळला होता. १९५६ पासून 'हंस', 'मोहिनी' या मासिकातून त्यांनी विनोदी लेखनास प्रारंभ केला. विनोदी लेख, कथा, कादंबरी, चरित्रे अशा विविध क्षेत्रांत मुशाफिरी करून त्यात त्यांनी यश मिळवले होते. 'तारांबळ', 'करामत', 'बाळबोध', 'बाळक्रीडा' आणि 'बाळलीला' या त्यांच्या ग्रंथांना विशेष लोकमान्यता लाभली होती. 'मराठी नाट्यसंगीत', 'हितगुज', 'मर्मबंधातली ठेव ही', 'महापर्व', 'मोठी माणसे' ही त्यांनी संपादित केलेली पुस्तके त्यांच्या संपादन कौशल्याचा प्रत्यय आणून देण्यास समर्थ ठरली आहेत. 'मरणात खरोखर जग जगते' हा त्यांचा मृत्यू या संकल्पनेचा वेध घेणारा काहीसा तत्त्वचिंतनपर ग्रंथ १९९३ मध्ये प्रकाशित झाला होता. त्यामध्ये त्यांनी 'मृत्यू म्हणजे काय,' 'अतींद्रिय अनुभव', 'स्वेच्छामरण', 'पुनर्जन्म' इत्यादी गूढ विषयांचा परामर्ष घेतला होता. 'प्रेम ग्रंथ' (१९९६) या ग्रंथाबरोबरच 'हिटलरचे चरित्र', 'शिवचरित्र' ही त्यांनी लिहिलेली चरित्रे गाजली, तर 'शापित यक्ष' आणि 'तो राजहंस एक' या चरित्र ग्रंथांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'शापित यक्ष' या ग्रंथाला १९८३-८४ या वर्षातील मराठीतील सर्वोत्कृष्ट चरित्र ग्रंथ म्हणून मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे 'वि. ह. कुलकर्णी' पारितोषिक मिळाले होते. 'नवशक्ती', 'लोकसत्ता', 'सकाळ' आणि 'सोबत' या नियतकालिकांमधून सातत्याने ते स्तंभलेखन करीत होते. त्यांची 'न संपणाऱ्या गोष्टी', 'मैफल', 'बाळबोध' आणि 'मुलखावेगळे जग' ही पुस्तके म्हणजे निवडक स्तंभलेखांचे संग्रह होत. १९६८ साली पूर्व जर्मनीत लाईदझिंग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला भारताचे प्रतिनिधी म्हणूनही ते हजर राहिले होते. महाराष्ट्र राज्याच्या चित्रपट, नाट्य आणि कलाविकास महामंडळाचे संचालक म्हणूनही त्यांनी काही वर्षे काम पाहिले होते. वक्तृत्व ही तर त्यांची मिरासदारीच होती. शाळेमध्ये प्रत्येक स्पर्धेत कोणाचीही मदत न घेता वादविवाद स्पर्धेत त्यांनी अनेक बक्षिसे मिळवली होती. शालेय जीवनापासून वडाळ्याच्या सार्वजनिक वाचनालयात होणाऱ्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन स्वतः जातीने पुढाकार घेऊन ते करीत असत. त्यावेळी ते अनेक स्पर्धांचे आयोजन करीत आणि स्पर्धकांना बक्षिसे देत, तीही पुस्तकाच्या रूपाने. याच वयात इतर मुलांना प्रोत्साहन देऊन अनेक हस्तलिखिते त्यांनी काढली होती. त्यांची प्रस्तावना, त्याचे मुखपृष्ठ, आतील सजावट, हस्तलिखितातील अक्षर सर्व ते एकट्याने करीत असत. यातूनच खरेतर त्यांच्यामधील लेखक जागृत झाला

असावा. कॉलेज विश्वात आल्यानंतर त्यांच्या या प्रतिभेला आणखीनच बहर आला. रुईया कॉलेजमध्ये मराठी वाङ्मय मंडळाचा प्रमुख म्हणून त्यांनी उत्तमोत्तम साहित्यिकांना आमंत्रित करून अनेकविध कार्यक्रम आयोजित करून तिथेही आपला ठसा उमटवला होता. त्यावेळी प्राध्यापक न. र. फाटक यांच्या मार्गदर्शनाचा लाभ त्यांना मिळाला होता. त्यांचा ग्रंथसंग्रह हा सर्वांच्या कुतूहलाचा विषय ठरला होता. साहित्याबरोबरच संगीताचीही त्यांना आवड होती. एखाद्या विषयावर संशोधन करून त्यातून त्या विषयाची सखोल माहिती वाचकांपर्यंत पोहोचवण्याची हातोटी त्यांना लाभली होती. त्यांना अनेक मानसन्मान मिळाले होते. १९७० मध्ये खार, मुंबई येथील 'उपनगर साहित्य संमेलना'चे ते स्वागताध्यक्ष होते. १९९३ मध्ये मुंबई येथे भरलेल्या ७३ व्या नाट्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या या भरीव कामगिरीबद्दल त्यांना २००४ मध्ये 'पद्मश्री' हा किताब प्रदान करण्यात आला होता. दिनांक १८ जानेवारी २००९ रोजी त्यांचे मुंबई येथे निधन झाले. अशा या थोर व्यक्तिमत्त्वास जन्मशताब्दी वर्षानिमित्त सारस्वत चैतन्य परिवारातर्फे विनम्र आदरांजली.

# चिंतनिका

## एक छिद्र उरलेलं...

महाभारतातील ही गोष्ट तुम्हाला माहीत आहे का?
एक गरीब म्हातारा हस्तिनापूरला गेला. काहीतरी दान मिळेल, या आशेनं तो धर्मराजाला भेटला; परंतु तोपर्यंत सूर्यास्त झाला होता.
त्यानं धर्मराजाला काहीतरी दान द्यावं, अशी विनंती केली.
तेव्हा धर्मराज त्याला म्हणाले,
'आता सूर्यास्त झाला आहे. त्यामुळे मी आता दान देऊ शकत नाही. तू उद्या सूर्योदयानंतर केव्हाही ये. मी तुला निराश करणार नाही.'
तो गरीब म्हातारा नाराज होऊन परत फिरला.

या दोघांमधला संवाद बाजूला बसलेले भीमसेन ऐकत होते. तो गरीब म्हातारा निघून गेल्यानंतर भीमसेन धर्मराजाला म्हणाले,
'दादा, तुम्ही त्या याचकाला उद्या सकाळी दान देण्याचं वचन दिलं आहे; पण एक विचारू? माणसाला दुसऱ्या दिवशीच्या आयुष्याची खात्री देता येते?'
धर्मराजाला स्वतःची चूक कळली. त्यांनी लगेच त्या गरीब म्हाताऱ्याला बोलावलं आणि भरपूर दान दिलं.

भीमानं विचारलेला हा प्रश्न छोटासा असला, तरी तो अस्वस्थ करणारा आहे. आणि हा प्रश्न जो स्वतःला विचारतो, त्याला आयुष्याचं खरं महत्त्व कळतं.

'तो काल मला भेटला होता, आज तो नाहीये', 'तो मघाशी माझ्याशी फोनवर बोलला होता, आत्ता तो नाहीये.' असे अनेक प्रसंग आपल्या आजूबाजूला नेहमी घडत असतात.

'हा क्षण माझा आहे, पुढचा क्षण माझा नाही.' हे एकदा का आपण आपल्या मनात रुजवले की संताप, चीड, द्वेष, मत्सर या सगळ्या भावना आपोआप गळून पडतात आणि हातात राहतं सूर, ताल, लय, ठेका घेऊन आलेलं आयुष्याचं रंगीबेरंगी गाणं!

जी मोठी माणसं किंवा नेते मंडळी असतात,
ते गेल्यानंतरही त्यांचे चौकात पुतळे होतात.
जे शास्त्रज्ञ, विचारवंत असतात,
त्यांचे विचार आपल्याला ते गेल्यानंतरही पुस्तकातून भेटतात.
जे कलावंत, गायक, खेळाडू असतात,
ते गेल्यानंतरही ते त्यांच्या कलेतून, कृतीतून आपल्याला आठवतात.
पण आपल्यासारख्या सामान्य माणसाचं काय? शरीरातून जीव गेल्यानंतर कुठं असतो आपण? कुठल्या रुपात मागे उरतो आपण?
माझ्या घरात
आज मी आहे,
उद्या मी नसेन,

माझ्या जागी
एक मिणमिणता दिवा असेल.
दहा दिवसांनी तो दिवा विझेल आणि
त्या जागी माझा एक फोटो असेल.
लाकडी चौकट,
कोरीव नक्षीकाम,
आणि हसरा फोटो.

काही दिवसांनी मात्र
माझ्या लटकलेल्या फोटोवर
साचलेली धूळ असेल
किंवा त्या फोटोची पातळ काच
वेडीवाकडी तडकलेली असेल.

काही वर्षांनी
माझा तो हसरा फोटो
भिंतीवरच्या छिद्रातून
खिळ्यासकट निखळलेला असेल.

आणि मग त्यानंतर
पिढ्यान्‌पिढ्या
माझ्याच घरात
माझ्या नावाचं
फक्त उरलेलं एक छिद्र असेल!

आपलं रूपांतर अशा छिद्रात होण्यापूर्वी आपल्याला दानात मिळालेल्या ह्या श्वासांचं रूपांतर आपण उत्सवात करायचं का?

कोणालाही दुखवू नका,
कोणालाही कमी लेखू नका,
कोणाचाही अपमान करू नका,
कारण तुम्ही केलेले हे कर्म तुमच्याकडेच फिरून येणारे असते.
म्हणून
'जगा आणि जगू द्या.'

**- अज्ञात**

---

मुद्रण आणि पुस्तक नोंदणी अधिनियम १८६७च्या कलम ९९ड(ब) आणि वृत्तपत्र नोंदणी (मध्यवर्ती) नियम १९५६च्या नियम ८ अन्वये नेमून दिलेल्या नमुन्यानुसार दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसानंतर प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांच्या पहिल्या अंकात प्रकाशित करावयाचे निवेदन.

नमुना चार : (नियम ८ पहा)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ : | **मुंबई** |
| २. प्रकाशनाचा अवधी : | त्रैमासिक |
| ३. मुद्रकाचे नाव : | **राहुल रामकृष्ण साखळकर** |
| भारताचा नागरिक आहे का? : | होय |
| पत्ता : | सी/२, राजा कॉटेज, मिलिटरी रोड, मरोळ, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००५९ |
| ४. संपादकाचे नाव : | **सुधाकर वसंत लोटलीकर** |
| भारताचा नागरिक आहे का? : | होय |
| पत्ता : | १०१, जयेश कुटिर कैलासनगर, डोंबिवली (प.) – ४२१२०२ |

६. वृत्तपत्राची मालकी असलेल्या व्यक्तीची आणि एकूण भांडवलापैकी एक टक्क्यापेक्षा अधिक भाग असलेल्या भागीदाराची व भागदारांची नावे व पत्ते :

सारस्वत प्रकाशन (मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमानुसार नोंदवलेली विश्वस्त संस्था, नोंदणी क्रमांक ई–१३३६४–मुंबई)

मी राहुल रामकृष्ण साखळकर याद्वारे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

सही/–
(राहुल रामकृष्ण साखळकर)
प्रकाशकाची सही

# नव'वर्षा...'च्या शुभेच्छा!



मयुरेश पाडगांवकर

**आजानुबाहूप्रमाणे सर्व दिशांनी पसरलेल्या विस्तारीत मुंबईच्या पुनर्विकासाचं आलेलं पीक आणि या 'ज्वरात' घायाळ झालेली पन्नास वर्षांपूर्वीची 'वर्षा' ही मुंबईतील मराठमोळ्या श्रीकृष्णनगरमधील, बोरीवली पूर्वेकडील वास्तू! या वास्तूच्या पुनर्निर्माणाच्या वाटचालीतील भग्नावशेष न्याहाळताना लेखकाला अभिप्रेत असलेल्या भावना व काही सत्यघटनांवर आधारित हा लेख आहे. शहरात बहरलेल्या अनेक पुनर्विकसित प्रकल्पात थोडे-बहुत असेच विचार, अनुभव व येणाऱ्या आठवणींना उजाळा देतानाच 'नव्याचा स्वीकार हाच भविष्याचा आकार' हे सुचवून देण्याचा हा लेखरूपी प्रयत्न!**

नुकतीच तिची पन्नाशी पार झाली होती. १९७२ ते २०२२चा प्रवास जिव्हाळ्याचा, अप्रतिम क्षणांचा, अभेद्य बंधांचा आणि नात्यांचा झाला होता. पन्नाशीनंतर डोकावणाऱ्या अजोड जीर्णतेची चाहूल मागील दोन वर्षांपासूनच खुणावत होती. कपाळावरच्या काळ्याभोर केशसंभाराप्रमाणेच डोलणारे, घरंगळणारे आता मधेच झुकलेल्या पर्णांचे-पातींचे-फांद्यांचे भद्ररूप दाखवू लागले होते. चेहऱ्यावरच्या, हाता-पायांवरच्या त्वचेवरून वृद्धत्वाच्या नांदीची घंटा, सुरकुत्यांच्या रूपात नजरेत टिपली जाऊ लागली होती; परंतु काही जिवांना सदैव आकर्षकता, सोज्वळता, सुंदरता आणि सुबकतेचं वरदान प्राप्त झालेलं असतं. उदाहरणार्थ, शर्मिला टागोर, हेमा मालिनी, माधुरी दीक्षित इत्यादी. अगदी तसंच काहीसं हिच्या बाबतीत आहे! मोक्याच्या जागी डौलदार उभी राहून आजूबाजूस असलेल्या गर्दीत स्वतःच्या चैतन्यानं, सौंदर्यानं आणि मादकतेनं सर्वांचं ध्यान वेधण्यात ती नेहमीच यशस्वी ठरली. वयाच्या बावन्नाव्या वर्षीसुद्धा बावनखणी सोन्यापरीस तिचं देखणेपण दृष्ट लागण्यास कारणीभूत ठरत असावं! दोन-तीन वर्षांपासून तिच्या प्रकृतीची होणारी हेळसांड, गुडघेदुखी, सांधेदुखी, केसगळती अशा अनेक विकारांवर तितक्याच धैर्यानं मात करत ती नेटानं उभी होती. आजकालच्या यंत्रगती युगात निभावून नेण्यास ती समर्थ आहे, असं भासवण्याचा तिचा प्रयत्न केविलवाणा ठरू लागला आणि 'बायपास ते ओपनहार्ट' या विविध उपायांच्या चर्चा रंगू लागल्या. नामवंत व विशारद व्यावसायिकांच्या भेटीगाठी होऊ लागल्या आणि अंतिम निर्णय ठरला, 'हार्ट ट्रान्सप्लांट!' हे इतकं सोपं असतं का ?

अनिश्चिततेचं आयुष्य हेच कोविड -१९ नंतर संपूर्ण जगानं आचारलेलं व अंगिकारलेलं वास्तव. मग यात हिचा काय अपवाद? सर्वानुमते विचार-विनिमयाअंती निर्णय झाला, की आजच्या काळास निभावून नेण्यास एकमेव पर्याय आणि तो म्हणजे रिडेव्हलपमेंट. ५२ वयाच्या 'वर्षा' इमारतीची घोडदौड सुरू झाली 'हार्ट ट्रान्सप्लांट'च्या स्वरूपात आणि रिडेव्हलपमेंटच्या रूपात.

'पुनर्निर्माण होणारच' हे वास्तव स्वीकारण्यास पर्याय नाही, हे पक्कं माहीत असतानाच बावन्न वर्षांतल्या सहवासातील तिखट-गोड, आंबट, खारट आणि मनाला चटका लावून गेलेल्या कटू सत्याचंही पुनर्निर्माण होणार का? हा प्रश्न मला सतावतोय. याची उत्तरं कुठं, कशी आणि केव्हा सापडतील? 'हार्ट ट्रान्सप्लांट' झाल्यानंतर वसणाऱ्या नवीन इमारतीच्या हृदयात 'या बसा' आणि 'नमस्ते' हे भाव असतील का? तुळशी वृंदावन व दोन बाकडे नवीन रूपात बनतीलही; परंतु त्या बाकड्यांवर 'दगड का माती?' हा खेळ पुन्हा रंगेल का? नवीन तुळशी- वृंदावनात पुन्हा ५२ वर्षांतील तुळशीच्या लग्नाची सरबराई, परंपरागत मांडणी, ओवाळणी-प्रसाद आणि लग्न लागल्यानंतरचा वाटलेला खाऊ म्हणजेच बत्तासे, लाह्या उसाचे छोटे तुकडे, फुटाणे यांचं प्रेमळ व भावनिक मधुरपण पुन्हा प्राप्त होणार का? लग्नानंतर वाजणारे व तुळशीच्या लग्नापर्यंत शाळेच्या पत्र्याच्या पेटीत जपून ठेवलेले फटाके पुन्हा फुटणार का?

१९७२च्या शुभ मुहूर्तावर दोन मजली उभी राहिलेली 'वर्षा' ही इमारत! महाराष्ट्रात 'वर्षा' या नावाचा वलय, प्रतिष्ठा, अधिकार आणि सत्ता या रूपात आकार सामावलेला असल्याकारणानेच का होईना, यातील 'सत्ता' वगळून बाकी सर्व प्लॉट नं. १४३, 'वर्षा' या निवासस्थानाने प्रत्यक्षरुपी अनुभवलं! श्रीकृष्ण नगरात छोटेखानी, टुमदार बंगल्यांच्या सुबक मराठमोळ्या वसाहतीत हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच इमारतीत 'वर्षा' ही एक वास्तू.

अण्णा दाभोळकर हे एक सुजाण, उच्च शिक्षित

विचारवंत व द्रष्टे सारस्वत! त्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली 'वर्षा'चा पाया व दोन मजल्यांवरचा गच्चीरुपी कळस रचला गेला. कुडाळच्या दाभोळकर कुटुंबीयांच्या मालकीत बडोद्याचे एकबोटे, बेळगावचे सराफ आणि सावंतवाडीचे पाडगांवकर अशी तीन भाडेकरूंची सेना घेऊन 'वर्षा' हाऊसफुल्ल झाली. 'मालक-भाडेकरू' हा सौदा फक्त कागदोपत्री ठेवण्यात व एकमेकांना प्रेमानं, सौहार्दानं, जिव्हाळ्यानं 'वसुधैव कुटुंबकम्' राखण्याचा मान आजींनाच (अण्णांची सहचारिणी) जातो. आजींनी रोवलेलं आपुलकीचं आणि एकसंधतेचं बीज श्यामकाका-सरूकाकी आणि उल्हासकाका-लताकाकी यांनी रुजवलं आणि त्याचा वटवृक्ष बनविण्याचं काम सर्व कुटुंबातल्या आमच्या म्हणजेच पुढच्या पिढीनं केलं; परंतु मशागतीचं मुख्य कार्य एक दिलदार, स्वच्छंदी, मनमिळाऊ, प्रेमळ आणि हसतमुख अवलिया करून गेला आणि ते म्हणजे आमचे 'श्यामकाका'. सर्व मुलांना (यात मालक भाडेकरू मतभेद नाही.) आपल्या फियाट कारमधून दर रविवारी लॉंग ड्राईव्हला नेणं, स्वतःच्या कुटुंबासाठी विकत घेतलेली फळं, फुलं, खाऊ न चुकता वाटणं व उरलेला घरी नेणं. कोणत्याही घरातल्या वाढदिवशी 'हॅप्पी बर्थडे'चं गीत स्वतःच्या घरातल्या म्युझिक सिस्टीमवर मोठ्या आवाजात वाजवणं आणि सदासर्वदा गेट उघडून पहिल्या मजल्यावरच्या आपल्या घरी परतताना आमच्या खिडकीत 'मयुशेठ' अशी आरोळी ठोकणं इत्यादी. श्रीकृष्णनगरातल्या सार्वजनिक उत्सवातला त्यांचा सहभाग, दानशुरता आणि सामाजिक बांधिलकीची जाण कायमस्वरूपी मनावर कोरली गेलीय. उल्हासकाका हे मितभाषी आणि म्हणूनच कदाचित त्यांच्या वाट्याचं बोलणं 'लताकाकी' म्हणजेच आमच्या सर्वांच्या लाडक्या 'लिनाच्या आईनं' अंगिकारलेलं असावं. सरूकाकी-लताकाकी, मेधाची आई, मयुची आई, अभिजीतची आई, मकरंदची आई, शितलची आई, आनंदची आई, तेंडुलकर काकी ही वर्षातली महिला मंडळी. या महिला मंडळींनी एकत्र जमून तयार केलेले पापड, लोणची, मुरांबे, दिवाळीचा फराळ, ऋषिपंचमीची भाजी आणि गुजराथी उंदियो या सर्वांची चव, गोडी आजही कोणत्याच खानावळीत किंवा फुडमॉलपासून फाईव्हस्टार हॉटेलच्या किचनमध्ये कधीच सापडू शकणार नाहीत. या सर्व नावांवरून हे नक्कीच समजलं असतं, की वर्षा ही इमारत नसून एक वसाहत होती.




आनंद-प्रिया, शितल ही कवळे कुटुंबीयांची पुढील पिढी, विसपुतेंचा मकरंद, एकबोटेंच्या घरातील अभिजीत-आसावरी, त्यांचीच आत्येबहीण; परंतु संपूर्ण वर्षाची ऊर्जा लिनू, प्रज्ञा, मेधा, संगीता, मंगेश हे सराफ कुटुंबीय; मथुरेश मंदार पाडगांवकरांचे वारस; तर श्रीकांत, समीर, लिना, संपदा, रूपा ही दाभोळकर मालकांची पुढील पिढी. या सर्व मित्र-मैत्रिणींबरोबर व्यतित केलेल्या क्षणांची, अनुभवांची साक्षीदार आहे 'वर्षा'. इतक्या मोठ्या संख्येनं उन्हाळ्याच्या सुट्टीत व दिवाळीच्या सुट्टीत एकत्र जमून खेळलेल्या उभ्या बसक्या खेळातून प्राप्त झालेला आनंद, विजेतेपदाची भावना, क्षणिक झालेल्या भांडणातून व्यक्त केलेला संताप, तर एकत्रित केलेल्या अभ्यासातून प्रस्थापित झालेला गंभीरपणा, वाचकता, विचारक्षमता आणि सखोलता ही वर्षाची देणं आहे. 'गच्ची' या वास्तूत 'खांब-खांब खांबोळी' या खेळाबरोबरच कोजागिरी पौर्णिमेचं मसाला दूध, भेळ व सँडविचची चव आजही जिभेवर तरळतेय. कोजागिरीची पूर्णाकृती चंद्राची प्रतिमा वर्षाच्या गच्चीतून मनावर कोरली गेली असल्यामुळं इतर ठिकाणांहून कोजागिरीचा चंद्र आता पूर्णाकृती आकार घेत नाही. दुसऱ्या मजल्यावरच्या वरच्या खोलीत खेळलेले पत्ते, कॅरम, विविध विषयांवरच्या चर्चा आणि साजरे केलेल्या ३१ डिसेंबरची गोडी आता मोठ्या क्लब, हॉल्स किंवा फार्महाऊसमध्येही सापडत नाही. एका ३१ डिसेंबरच्या वरच्या खोलीतल्या पार्टीत आयुष्यातली सर्वप्रथम मदिरा सेवनाची कृती आणि त्यानंतर आलेली 'झिंग' पुन्हा अनुभवणं नाही. या सर्व मित्रपरिवारांसह खेळलेले डबा ऐसपैस, चोर-पोलीस यांची सर कोणत्याही ऑलिंपिक किंवा वर्ल्ड कपला केव्हाच येणार नाही.

'वर्षा'चा 'वर्षाव' झाला. याचं कारण म्हणजे रिलायन्स क्रॅकर्स आणि गणेशोत्सवातील एक दिवसाचा तीन तासाचा करमणुकीचा कार्यक्रम. फटाक्याच्या व्यवसायात रात्री-अपरात्री (मध्यरात्री) होलसेलनं विकत घेतलेले फटाके, फायरशोचे वज्रधनुष्य उचलताना 'अब्दुल मुकीम' या निष्णात फायरशो कारागिराबरोबर झालेली बिझनेस मिटींग, फटाक्यांचं पॅकिंग व डिलिव्हरी, नफा झाल्यावर गच्चीत केलेला समारंभ, यांसारख्या अनेक आठवणी स्मृतिपटलावर आयुष्याच्या अंतापर्यंत तरंगत राहतील. 'वर्षाव' या शिर्षकांतर्गत सादर केलेला नाट्य-नृत्य-संगीत

हा सदाबहार कार्यक्रम! या कार्यक्रमाच्या तालमींसाठी घेतलेले अपार परिश्रम, नेपथ्याची कास, समूह गीत-प्रार्थना-ऐतिहासिक गीतांचा सूर आणि नाटकाच्या तालमीतले म्हणजे ‘तुमचं सगळीकडं लक्ष असतं तर’ या डायलॉगनं घडविलेला इतिहास, कसं होईल या सर्वांचं नुतनीकरण?

मकरंद विसपुते या ‘वर्षा’च्या अविभाज्य संस्कृतीतला एक असामी. पुण्याला होऊ घातलेला लग्नाच्या वरातीतील प्रवास, खंडाळ्याच्या भर पावसात अनोळखी घरचा चहा-बिस्किटांचा फडशा, पुण्याच्या हॉलमधील वास्तव्य, प्रसाद पै या मित्राची हरवलेली विशेष ‘वस्त्रे’ आणि त्याची शोधमोहीम, लग्नाहून परतीच्या प्रवासातील ब्रेक-डाऊन झालेल्या गाडीस काळ्याकुट्ट अंधारात उभं करून भोवताली केलेला गरबा आणि कित्येक विनोदी प्रसंग. मकरंदच्या घरातील दीड दिवसाचा गणपती हा विसपुते खानदानाचा कधीच नव्हता, तो होता ‘वर्षा’ वसाहतीचा!

हिमालय, अंतराळ, समुद्र यांसारखे विविध हटके देखावे बनविण्याचा अट्टाहास, त्यांच्या तयारीसाठीच्या मिटींग्स, मखर बनवताना सर्वांचे एकत्र कसणारे हात, गणेशाचे आगमन, प्रतिष्ठापना, तासभर चालणाऱ्या आरत्या, पहिल्या रात्री रंगणारी वेशभूषा स्पर्धा, गाणी, नकला, विसर्जनाची मिरवणूक आणि विसर्जनानंतर श्रमपरिहारास्तव मकरंदच्या आईनं बनविलेले मांसाहारी भोजन! आजही त्या भोजनाची चमचमीत चव आठवणीनं तोंडाला पाणी आणते ! मकरंदच्या पुणे मार्गस्थानानंतर लोप पावलेली ही मांदियाळी, नुसत्या आठवणींनच नजरेची कडा ओलावते.

दोन असामान्य प्रतिभेच्या व्यक्तिमत्त्वांच्या आगमनाने ‘वर्षा’ या वास्तूला परीसस्पर्शाचा आशीर्वाद लाभला. जगद्विख्यात नामवंत सुप्रसिद्ध क्रिकेटपटू सुनील गावस्कर हे पाडगांवकरांच्या घरात चक्क विराजमान झाले होते. चिखलवाडीतील पाडगांवकर यांचा त्याच वाडीत क्रिकेटचे धडे घेत महान फलंदाज झालेल्या सुनीलशी असलेला संबंध, श्रीकृष्णनगराने ‘याचि देही याचि डोळा’ अनुभवला. दुसरं म्हणजे, बडोद्याच्या एकबोटेंकडे गणपती उत्सवात जमलेली मैफील! दस्तुरखुद्द गानसम्राट कुमार गंधर्व ‘वर्षा’मध्ये पहाटे चार वाजेपर्यंत सूर आळवत होते. आज ‘वर्षा’चे बुरूज कोसळताना प्रत्येक विटेतून प्रकट होणारा ध्वनी, सुनीलच्या स्ट्रेट ड्राइव्हचा स्वीट साउंड व कुमार गंधर्वांच्या गळ्यातील पहाडी सुरांची साद घालताना ऐकू येतोय! नवीन वास्तूमधील बुरुजांत हा सूर लागेल का?



‘वर्षा’ या वास्तूची मांडणीच मोक्याच्या जागी असल्यानं ऑक्ट्रोय नाका म्हणून योग्य होती. त्यामुळंच बहुधा येणाऱ्या-जाणाऱ्या सर्वांनाच त्याचा जाब द्यावा लागे. हा जाब प्रेमाचा-आपुलकीचा आणि परस्परांतील संवादाचा असे. तळमजल्यावर मयुच्या आईच्या ऑक्ट्रोय चेक पोस्टच्या खिडकीत चेहऱ्याचे बायोमेट्रिक ओळखपत्र दिल्याशिवाय पुढच्या मार्गी लागणं, ही काय सहज बाब नसे! आणि त्यातच मेकर आणि चेकर रितीस अनुसरून कोणी निसटलाच, तर पहिल्या मजल्यावरील मधल्या खिडकीत लताकाकींचा ‘तिसरा डोळा’ सीसीटीव्हीच्या रूपात त्यास अचूक हेरत असे. आणि या दोघींकडूनही निसटून जर कोणी नशिबवान ठरू पाहाणाऱ्यास ‘बाळकाका’च्या दोन्ही हातांची घट्ट दंडपकड म्हणजे वर्षाच्या अतिसुरक्षित ‘झेड सिक्युरीटीची’ हमीच असे. ‘बाळकाका’ हे एक अजब-गजब रसायन आणि तितकंच विनोदी-प्रेमळ व्यक्तिमत्त्व! बाह्यजगासाठी ‘बाळू’ या टोपणनावाने प्रचंड संतापणारा बाळकाका आयुष्यभर ‘ज्ञानेश्वर विद्यालय-वडाळा’ या शालेय जीवनाच्या पुढील मानसिक व बौद्धिक वयात वाढलाच नाही! ‘बिच्चारा...’ या विशेषणासाठीच बहुदा देवानं त्याला मानवाचं रूप घेऊन धाडलं असावं कदाचित!

भाजीवाला-मीठवाला-फळवाला, मासे घराच्या दरवाजापर्यंत आणणारे वेणू व मामा इत्यादी मंडळी म्हणजे ‘वर्षा’ची इको-सिस्टीम. या सर्वांची विशिष्ट पद्धतीनं ओरडून आपण विक्रीस आल्याचं दर्शवणं हा एक गजब प्रकार असायचा. ‘ओ-मीठवाला, जाडा-बारीक’, ‘बाई-भाजीवाली’, ‘वहिनी अळू’ ‘केला... ओ केला...’ ही विशिष्ट हेलरूपी उच्चारलेली विक्रीस साजेशी आरोळी प्रसिद्धीस नेण्याचं काम दुसऱ्या मजल्यावरून अभिजीत एकबोटेनं अप्रतिम केलं. आज सुपर मार्केटच्या स्मशान शांततेत भाजी-फळं-मीठ खरेदी करताना गरज सरते; परंतु समाधान मात्र हरवलंय!

‘वर्षा’ ही वास्तू असंख्य व संमिश्र घटनांची साक्षीदार आहे. अचानक

# सारस्वत हितवर्धक मंडळ

॥ संहतिः कार्यसाधिका ॥

१९२४-२०२४

१०० शतक महोत्सव

सारस्वत भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोगल लेन), माहीम, मुंबई - ४०००१६

8828800727 | shm1924@rediffmail.com | www.bhalavalikarsaraswat.org

**समाज बांधवांनी सर्वांगीण प्रगती साधून उत्तम आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठा मिळवावी अशा ध्येयाने प्रेरित १९२४ सालापासून कार्यरत असलेली भालावलीकर सारस्वतांची संस्था**

## माहीममध्ये मध्यवर्ती, सोईस्कर जागी संस्थेची इमारत व २५० आसन क्षमतेचे वातानुकुलित सुसज्ज सभागृह



## इतर उपक्रम

**शिक्षण**
आर्थिक, गणवेश व इतर साहित्याची मदत, विद्यार्थी शैक्षणिक मार्गदर्शन, शिक्षकांना प्रशिक्षण, शाळांना शिक्षण साहित्य, विद्यार्थी गुणगौरव

- असहाय्यांना आर्थिक मदत
- समाजातील कार्यशील, यशवंत व्यक्तींचा सन्मान
- मंडळाच्या क्षेत्रातील योग्य कार्याला कृतिशील प्रोत्साहन

**वैद्यकीय**
आरोग्य, नेत्र तपासणी शिबीर, गरजू रुग्णांना अर्थसहाय्य

- वधुवर नोंदणी व मेळावा
- सामुहिक व्रतबंध

झालेला संपूर्ण भारत बंद, मुंबई बंद; परंतु या परिस्थितीतही कोणतंही संकट न येता आयोजलेला व आनंदानं पार पडलेला लिनाचा विवाह; तसंच घरच्या वातावरणात सांस्कृतिक व पारंपरिक पद्धतीनं आयोजित केलेली वर्षाच्या प्रांगणातील मंदारची मुंज; गच्चीवर साजरा करण्यात आलेला पाडगांवकर दांपत्याचा पंचविशी विवाह सोहळा, असे सुखाचे क्षण 'वर्षा'नेच दिलेत.

त्याचबरोबर मनाला चटका लावून जाणारे आजी, अण्णा, श्यामकाका, लिनाची आई यांचं देहावसान. सुन्न करून गेलेला आणि पायाखालची जमीन हादरवून टाकलेला ३ ऑगस्ट १९९९ रोजी अकाली झालेला श्रीकांतचा मृत्यू. वर्षा त्याच दिवसापासून ढासळली होती! अतिशय प्रेमळ, मनमिळाऊ, सदा हसतमुख, दानशूर व मित्रांसाठी देव असलेला श्रीकांत. 'जो आवडे सर्वांना, तोचि आवडे देवाला' म्हणूनच असेल कदाचित! तो फार लवकर सोडून गेला, वर्षाला.

'वर्षा' या इमारतीस वसाहतीचा दर्जा देण्याचं पुण्यकर्म करणारे अनेक लाभले आणि हेच तिच्या सर्वांना एकत्रित सामावून घेणाऱ्या वृत्तीचं कौशल्य व सगुणाचा अविष्कार. 'वर्षा' वसाहतीचं प्रवेशद्वार कायम सुस्वागताला तत्पर असावं आणि म्हणूनच यात अतुल परूळेकर, धनु तांबट, विरेंद्र, राजेशमामा (शानभाग), दिलीपमामा (देशपांडे), विवेककाका (एकबोटे), छाया पै, लिनू, प्रशांत टिपणीस इत्यादी अनेकांचे आगमन झाले. हे सर्व आपुलकीची झोळी घेऊन आले आणि आजतागायत त्यांची झोळी वर्षावाने तुडुंब भरलेलीच आहे. यातील प्रत्येकानं 'वर्षा'ला दिलेल्या रिटर्न गिफ्ट्सची बात औरच निघाली.

धनु 'वर्षा'ला 'ग्लॅमर' घेऊन आली. परंपरागत काकूबाई लूकचा 'मॉड फेस' होती धनु आणि तितकीच चंचल ! अतुलच्या खेळीमेळीनं नकलाकाराची निपुणता, नेपथ्यकला, कळ्या काढण्याची अजब सचोटी आणि रंगमंचावरील सहजता हे वर्षाला प्राप्त झालेले अनोखे लेणे.

राजेशमामाने आपल्या वास्तव्यात 'गाणे सहज गाता येते' हे सिद्ध करून दाखवलं आणि त्याचं मोस्ट फेवरेट 'मेरी महुआ, मेरे मित रे'ची तान 'वर्षा'ला कायमची महुआ बनवून गेली!

लिनूने वर्षाला आगळा-वेगळा आत्मविश्वास व निर्मळ मनाचा आहेर दिला. हिचं खरं नाव लिना; परंतु घरातलं लाडाचं नाव 'लिनू'. 'वर्षा'नं लिनूला आपल्यात सामावलं आणि पूर्ण इमारतच तिचं घर झालं. निखळ-निर्व्याज-निस्वार्थी मैत्रीचा आदर्श म्हणजे लिनू!

छायाच्या बोलीतच गती होती. चपळता आणि निखळ आनंदाचा आस्वाद कसा घ्यावा, याचे धडेच ती 'वर्षा'ला देऊन गेली. रम्य ते बालपण असं म्हणतात, याची सत्य कथा म्हणजेच वर्षाने छायासमवेत अनुभवलेले क्षण!

मकरंद हा 'वर्षा'चा की 'वर्षा' मकरंदची? हा विश्वप्रश्न. १९७०-८०च्या जमान्यात श्रीमंत मित्र मिळावा आणि त्याने श्रीमंती फक्त आणि फक्त मैत्रीची जोपासावी यासारखं भाग्य फक्त वर्षाच्याच वाट्याला आलं आणि तेही मकरंदच्या रूपानं!

प्रशांत आला, त्यानं पाहिलं आणि जिंकलं. विशेष म्हणजे प्रशांत टिपणीस 'वर्षा'चा जावई झाला आणि संपदा दाभोळकर, सौ. संपदा टिपणीस झाली.

ह्या सर्वांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागाशिवाय वा आठवणीशिवाय 'वर्षा'चा वर्षाव होऊच शकला नसता! आणि जसा 'वर्षाव' आपल्या शीत तुषारांनी सर्वांनाच सुखात न्हाऊन चिंब करतो अगदी तसंच 'वर्षा'नं सर्वांसाठी आपल्या मायारूपी आभाळाचं छत्रच पांघरलं. जे कोणी या छत्राखाली विसावले ते कायमस्वरूपी. यात 'वर्षा'चे झालेले संजय शानभाग, राजेश पेडणेकर, प्रशांत टिपणीस, सुशील जावळे, गागारीन रायकर, ऋषिकेश सावंत, श्रीरंग काग्रेकर हे जावई; तर माप ओलांडून आलेल्या सौ. सुमेधा, सौ. सिद्धी, सौ. दीपा, सौ. सतबीर, सौ. पल्लवी यांनी 'वर्षा'ला नावीन्यरूप व नावीन्यलंकार दिलेत. वर्षावचा महावृक्ष होताना आणि अंकुरलेली फळं व बहरलेली फुलं बघताना ऊर अभिमानानं उंच होतो.

याच वास्तूत शैक्षणिक क्षेत्रात असामान्य यश मिळवण्याचं कार्यही घडलं. अभिजीत लिना हे आर्किटेक्ट, मंदार-प्रज्ञा इंजिनीअर, तर रूपाने 'वर्षा'वर कळस चढवला. एसएससी बोर्डात तिसरा क्रमांक पटकावून रूपा दाभोळकर हिनं प्रचंड यशकिर्ती संपादन केली. तिच्या झालेल्या प्रत्येक सत्काराचा मी प्रत्यक्षदर्शी श्रोता होऊ शकलो, याचा मला वर्षाभिमान वाटतो. रूपा आज डॉक्टरेट (पीएचडी) असून अमेरिकेत उच्चपदस्थ अधिकारी आहे. सौ. प्रज्ञा एमसीजीएम बृहन्मुंबई महानगरपालिका येथे इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग क्षेत्रात



# सारस्वत दीनवत्सल संघ

**स्थापना : दसरा दि. ५ ऑक्टोबर १९०८**

द्वारा: सारस्वत ब्राह्मण समाज, मधुकोष, सारस्वत बँक बिल्डींग,
१ला मजला, शं. वि. सोवनी पथ, गिरगांव, मुंबई - ४०० ००४
दुरध्वनी: २३८९ ८९९४, द्वारा: २३८६ २२६९, ईमेल: saraswatdeenvatsalsangh@gmail.com

## सारस्वत दीनवत्सल संघाचे उद्देश

**गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील निरनिराळ्या पोटभेदांकडे लक्ष न देता अनाथ, अविवाहीत स्त्रिया, विधवा, असहाय्य, अपंग व विपदग्रस्त अशा व्यक्तींना आर्थिक, वैद्यकीय मदत करणे व ज्ञातीतील अनाथ प्रेतसंस्कारास मदत करणे. गेली ११६ वर्षे हे मदतकार्य निरंतर चालू आहे.**

## दीनवत्सल संघाकरिता आपण काय करावे

१. सभासद नसलेल्यांना सभासद करावे

२.सभासद असलेल्यांनी अनुकुलतेप्रमाणे आपली वर्गणी वाढवावी.

३.विवाह, व्रतबंध यासारख्या मंगल व आनंददायक प्रसंगी देणगी द्यावी

४.प्रत्येक बंधु-भगिनींनी एकतरी सभासद मिळवून द्यावा.

५.स्मारक निधी साठी भरभरून देणगी द्यावी

६.ज्याना उत्साह व आवड असेल त्यांनी संघाचे स्वयंसेवकत्व पत्करून त्याचे सभासद वाढविण्यास, दिवाळी व इतर योग्य प्रसंगी देणग्या जमविण्यास हातभार लावावा.

७.परिचयातील अनाथ, अविवाहीत स्त्रिया, विधवा, असहाय्य, अपंग व विपदग्रस्त अशा व्यक्तींना संघ देत

## सभासदांचे प्रकार

| | | |
|---|---|---|
| आश्रयदाता | : | रू. ५०००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| वाली | : | रू. २०००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| सहाय्यक | : | रू. १०००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| तहह्यात | : | रू. ५००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| हितचिंतक | : | संघाचा उद्देश साधण्यासाठी वेळोवेळी उदार अंत:करणाने देणग्या देऊन सहाय्य करणारे (हितचिंतक, कोणत्याही धर्माचे अगर ज्ञातीचे असू शकतात) |
| स्मारकनिधी | : | कोणत्याही दिवंगत व्यक्तीच्या स्मरणार्थ रू २०००/- अगर त्याहून जास्त रक्कम संघाकडे पाठविल्यास त्या नावाने स्मारक निधी प्रस्थिपित करण्यात येतो. |
| वार्षिक निधी | : | संघ मदत करत असलेल्या एक गरजू व्यक्तीस दत्तक घेऊन रू १६०००/- वार्षिक मदत करणे |

**देणगीदारांना ८० जी अंतर्गत करसवलत उपलब्ध आहे.**

व्यवस्थापक मंडळ

**सारस्वत दीनवत्सल संघ, मुंबई**

कार्यालयीन वेळ : सायंकाळी ६.०० ते ८.३० (रविवार बंद)



उच्चस्तरीय अधिकारी असून, लाल दिव्याची गाडी तिच्या सेवेत आहे. मंदार हा टाटा समूहाच्या टीसीई या कंपनीमध्ये जनरल मॅनेजर असून नुकत्याच यशस्वी झालेल्या चंद्रायानाच्या मोहिमेचा महत्त्वाचा घटक ठरला आहे.

सौ. लिना, कारवार या शहरातील सुप्रसिद्ध वास्तुविशारद म्हणून नावारूपाला आली आहे. अभिजीत एकबोटेही याच क्षेत्रात नामवंत आहे. आमच्या नंतरच्या जनरेशन एक्स पिढीच्या काही भाग्यशाली अपत्यांना वर्षाचं बाळकडू लाभलं.

तुळशी वृंदावनाकडे अंगाईगीत ऐकत झोपी जायची सवय असलेली मृणाली, गच्चीतल्या झोपाळ्यावर झुलत बालपणात रमणारी आकांक्षा व 'आता पलनाल' या बोबड्या भीतीनं खेळातले ठोकळे रचणारा संकल्प, मावशींना आपल्या बोबड्या बोलाने 'मेधापाची', 'संगीतापाची' म्हणणारा मिहीर, 'मनुकालू' म्हणजेच सूर्यकिरणांच्या प्रकाशानं स्वतःच्याच हाताच्या सावलीचं चित्र रेखाटणारी मानसी आणि वर्षामध्ये वास्तव्यास असणारा व गाढ झोपी गेल्यावर घरी पोहोचवावयास लावणारा, बोबड्या बोलांनी 'वाकल्या' असं निरागसपणे चिडवणारा मलय. या सगळ्यांना 'वर्षा'छत्राचा संयोग प्राप्त झाल्यानं म्हणा किंवा 'वर्षा' वसाहतीचा वारसा रक्तात वाहत असल्यानं म्हणा, प्रत्यक्ष भेटताना, बोलताना आपुलकी आणि जिव्हाळा त्यांच्या चेहऱ्यावर लपत नाही. 'वर्षा'च्या मातीत जन्मलेली ही रोपटी आज आपापल्या क्षेत्रात प्रगतीपथावर आहेत.

'भालेकर' ह्या चविष्ट व मांसाहारासाठी प्रसिद्ध हॉटेलचा मलय आज मालक असून स्वतः संपूर्ण कारभार चालवतो. मानसी पुण्यात मानसोपचार सल्लागार आहे. मिहीर मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या स्पोर्ट्स ॲनालिसीस विंगचा महत्त्वाचा घटक आहे. आकांक्षा एलएलबी, एलएलएमच्या पदवीनंतर हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाच्या उल्लेखनीय वकिलीपेशाच्या मार्गक्रमणावर आहे. मृणालीने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात विद्यापीठात नामांकनप्राप्त केल्यानंतर भारतातल्या प्रथम वीस विद्यार्थ्यांमध्ये निवड होऊन दिल्ली येथे 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इम्युनोलॉजी' या उच्च शैक्षणिक संस्थेत पीएचडीचं शिक्षण पूर्ण करत



आहे. 'वर्षा'च्या मातीचा एक अनोखा गुण म्हणजे आपुलकीचा, मिश्रणाचा आणि समन्वयाचा! यात कधीच जुन्या-नव्याचा भाव स्पर्शूनही गेला नाही.

'वर्षा'चे तुटून पडलेले भग्नावशेष न्याहाळताना कंठ दाटून आला होता. पावलांच्या जाणिवेची स्पंदनं नष्ट झाली होती. 'भूतकाळ विस्मृतीत जातोय' हे भय थरकाप करत होतं आणि त्यातच एका कोसळलेल्या कोपऱ्यातून सुधीर फडकेंच्या आवाजातील एक सुंदर गीत कानामध्ये गुणगुणू लागलं.

"आज राणी, पूर्वीची ती प्रीत तू मागू नको...
कालचे वेड्या फुलांचे रंग तू मागू नको..."

बहुधा तो कोपरा सराफांच्या बाल्कनीचा होता! मेधाचे बाबा तिथंच बसून सुधीर फडके आळवायचे! सुन्न होऊन भानावर येताच नजर पडली ती एका छिन्न-विछिन्न तुटलेल्या भिंतीच्या तुकड्यावर. जमिनीवर पहुडलेल्या या तुकड्यावर पांढऱ्या शुभ्र छोट्या टाईल्स जणू व्यक्त होऊ पाहात होत्या. बहुधा तुळशी वृंदावनाचा तो भाग असावा! जणू काही माझ्या मनातील वादळाचा झंझावात त्यास थांगपत्ता लागला असावा! थोडा जवळ जाऊन त्याला स्पर्श केला आणि त्याच्या अव्यक्त मुद्रेत जे वाचता आलं, ते म्हणजे,

'खूप आठवणी आहेत रे... पण ठीक आहे,
नवे स्वीकारले तरच ताजेतवाने राहता येते...'

'वर्षा' नवनिर्माणाचा भूमिपूजनाचा सोहळा पार पडला होता. श्रद्धेचं फूल वाहून आणि मनापासून शुभेच्छा देऊन मी साश्रुनयनांनी मागं फिरताना या वास्तूच्या चारही कोपऱ्यातून साद ऐकू येऊ लागली,

एकाच या जन्मी जणू
फिरूनी नवी जन्मेन मी
फिरूनी नवी जन्मेन मी...

***

***- लेखक एका नामांकित कंपनीत चीफ ऑपरेटिंग ऑफिसर असून अभिनय, नाट्यलेखन, दिग्दर्शन, निवेदन आणि मुलाखतकार म्हणूनही कार्यरत आहेत.***
***भ्रमणध्वनी : ९०२९०४९८५८***



॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

# बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण निधी

स्थापना : दि. ७ जून १९१४

नोंदणी क्र. एफ ८ (मुंबई) दि. ३०-१२-१९५२

## बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील एकमेव सामाजिक संस्था

- १०८ वर्षांची ज्ञातीतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीची परंपरा
- आतापर्यंत २५०० हून अधिक विद्यार्थ्यांना रु. २०,००,००० हून अधिक मदत
- बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना भरघोस पारितोषिके
- गरीब, निराधार, वरिष्ठ नागरिकांना पेन्शनसदृश मासिक आर्थिक मदत
- इस्पितळात येणाऱ्या खर्चाकरिता गरजू ज्ञातीबांधवांना मदत • वैद्यकीय मदत
- बारदेशकर ज्ञातीतील असामान्य मान्यवरांना पुरस्कार



## आगामी योजना

- वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष आर्थिक मदत
- परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अंशतः मदत





## विशेष

- १९०० हून अधिक सभासद
- सभासदत्व सर्व ज्ञातीबांधव/भगिनींसाठी खुले.
- निधीच्या विविध उपक्रमांसाठी देणग्या स्वीकारार्ह.

पत्ता : २, राजाराम निवास, प्लॉट नं. १७७, सर भालचंद्र मार्ग, हिंदू कॉलनी, दादर (पू.), मुंबई - ४०००१४.
ई-मेल: bardeshkar@gmail.com | website - www.bardeshkargsbnidhi.com

# कोल्हापूरचे वैद्यकीय विश्व



अनुराधा तेंडुलकर

## डॉ. विजय करंडे व डॉ. विनोद घोटगे

**डॉ. विजय शांताराम करंडे आणि डॉ. विनोद वसंतराव घोटगे ह्या दोनही ज्येष्ठ व्यक्तींशी माझी ओळख आणि भेट सारस्वत समाजाचे 'सारस्वत विकास मंडळ' आणि 'श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृहा'च्या माध्यमातून झाली; पण पुढं निमित्तानिमित्तानं त्यांच्याविषयी अधिकाधिक समजत गेलं आणि प्रथमदर्शनी निर्माण झालेला आदर वाढतच गेला...**

'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पना लयाला जातेय की काय, अशी भीती वाटत असताना, ज्यांच्याबद्दल लिहिलं नाही, तर माझी सदसद्विवेकबुद्धी मला सदैव टोचत राहील, अशा दोन ज्येष्ठ डॉक्टरांविषयी मला लिहायलाच हवं. ते दोन डॉक्टर म्हणजे डॉ. विजय शांताराम करंडे आणि डॉ. विनोद वसंतराव घोटगे. ह्या दोनही ज्येष्ठ व्यक्तींशी माझी ओळख आणि भेट सारस्वत समाजाचे 'सारस्वत विकास मंडळ' आणि 'श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृहा'च्या माध्यमातून झालेली प्रथम भेटच मुळी तेथील कार्यक्रमांमध्ये झालेली; पण पुढे निमित्तानिमित्ताने त्यांच्याविषयी अधिकाधिक समजत गेलं आणि प्रथमदर्शनी निर्माण झालेला आदर वाढतच गेला.

### डॉ. विजय शांताराम करंडे

डॉ. करंडे यांचं मूळगाव आणि जन्मगावही आचरे, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. त्यांचं शिक्षण आचरे, बेळगाव आणि कोल्हापूर येथे झालं. मुंबईच्या 'टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज'मधून त्यांनी 'एमबीबीएस'ची पदवी संपादन केली. त्यानंतर दोन वर्षं मेडिकल ऑफिसर म्हणून सेवा दिली. १९५७ मध्ये कोल्हापूरातील राजारामपुरीत चौथ्या गल्लीत आपला 'रेखा क्लिनिक' हा दवाखाना थाटून वैद्यकीय सेवेचा प्रारंभ केला. काही काळानंतर हा दवाखाना राजारामपुरीतच तेराव्या गल्लीत स्वत:च्या घरात स्थलांतरित केला. एकूण ५८ वर्षं त्यांनी फॅमिली फिजिशियन म्हणून अथक, अखंड सेवा चालू ठेवली. २०१५ पर्यंत ते कार्यरत राहिले. आसपासच्या परिसरातील गोरगरीब कुटुंबातील लहान मुलं हे त्यांचे प्रमुख पेशंट्स असत. मळक्या, फाटक्या कपड्यातल्या अस्वच्छ राहणीच्या मुलांना तपासतानाही कधी त्यांच्या कपाळावर आठ्या पडल्या नाहीत, की चिडचिड झाली नाही. कारण साने गुरुजींच्या विचारांचा प्रभाव आणि संस्कार त्यांच्यावर होता. 'मुले ही देवाघरची फुले' हे गुरुजींचे प्रियवचन ते कधीच विसरले नाहीत. 'सौम्यपणा' आणि 'करुणा' हे त्यांच्या जीवनाचे स्थायीभाव म्हटले पाहिजेत. एखाद्या बाळाचं दुखणं थोडं गंभीर असेल, तर नुसते औषधोपचार करून ते गप्प बसायचे नाहीत, त्यांना त्या बाळाची काळजी वाटे. तेव्हा भल्या पहाटे उठून स्कूटरला किक मारून त्या पेशंटच्या दारात त्याची विचारपूस करायला हजर होत. (आज विश्वास बसणार नाही, असे हे डॉक्टर करुणा आणि आस्था रोमारोमांत भरलेले होते.)

सुरुवातीच्या काळात त्यांची फी फक्त दोन रुपये होती; पण औषधं दिली तरच ते फी घेत. 'औषध दिलं नाही तर, पैसे कशाचे घेऊ?' असा त्यांचा उलट सवाल असे. गरिबांना तपासून, औषधयोजना करून ते थांबत नसत, तर त्या गोरगरिबांच्या अडचणी समजावून घेत आणि त्यांच्या साध्या साध्या गोष्टी – ज्या अशिक्षितपणामुळे त्या पालकांना समजत नसत, त्या त्यांना समजावून सागंत. हा समाज – शिक्षणाचा भागच एक प्रकारचा साने गुरुजींनी आपल्या साहित्यातून प्रेम, वात्सल्य, करुणा व माणुसकीचे धडे दिले पिढ्यान्पिढ्यांना! त्यांच्या आदर्शांना पुढे घेऊन जाणाऱ्या या धन्वंतरीनंही आयुष्यभर तोच कित्ता गिरवला.

काळ बदलला, जिथं तिथं स्पेशलायझेशनचं वारं वाहू लागलं. भपकेदार वातानुकुलित कन्सल्टिंग रूम्स, भपकेदार फर्निचर, डॉक्टरांचं दर्शन घडण्याआधी बाहेरच तपासणीआधी फी वसूल करणारी रिसेप्शनिस्ट, मोठालं प्रिस्क्रिप्शन आणि तपासण्यांची यादी अशी अगदी 'भरभराट' झाली आरोग्यसेवेची; पण आपले करंडे डॉक्टर स्वत: बदलले नाहीत, ना त्यांचा दवाखाना बदलला, ना बदलली त्यांची जीवनमूल्यं, ना रुग्णांबद्दलची कणव आणि आस्था. त्यांनी सुरुवातीपासून

सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी
स्थापना १९०२
॥ ज्ञानमयो भव ॥

# Saraswat
## Vidyarthi Sahayak Mandali

- **Educational Scholarships and Loan Scholarships to the Needy and Bright students of Saraswat Community.**
- **Scholarships given to Students of Schools, Graduation and Post-Graduation courses.**
- **Loan Scholarships for Post-Graduation courses abroad.**

**Office :**

**Chikitsak Samuha Bhavan,**
1st Floor, 52, Sadashiv Cross Lane,
Khadilkar Marg, Girgaum, Mumbai -4.

**Balwant Madgaonkar Student Hostel,**
Court Lane, Borivali (West),
Mumbai 400 092.

**Tel : 022-2386 9167**
**Mobile : 91369 39469 / 72086 09659**
**Mail : svsm1902@gmail.com**
**Website : www.svsmandali.in**
**Link : https://www.scholarships.svsmandali.in/login.php**



**डॉ. विजय करंदे**

अंगिकारलेला साधेपणा तसाच राहिला. कसलाही भपका नाही, अंगावर येईल अशी सजावट नाही, मोठी फी नाही, प्रसिद्धी आणि जाहिरातीचा हव्यास – धडपडही नाही. केलेल्या कामाचा गावाजावा तर मुळीच नाही.

सांज-सकाळ आपल्या दवाखान्यात पूर्ण वेळ पेशंटला देऊनसुद्धा १९८५ ते २००० ही पंधरा वर्षं त्यांनी बालकल्याण संकुलातील बाळांची काळजी पूर्णत: विनामोबदला प्रेमपूर्वक घेतली. हे सारं करायला 'माउली'चंच काळीज असायला हवं ना? गुरुजींसारखंच.

डॉक्टरांच्या सहवासात येण्याची संधी मला सारस्वत बोर्डिंगमध्ये मिळाली. अंदाजे पावणेसहा फूट उंची, शिडशिडीत अंगकाठी (त्यांचं वजन कमी-जास्त झालंय असं कधी दिसलंच नाही.), बारीक नेटके कापलेले केस, साधी पँट, सदैव पांढराशुभ्र (ॲप्रनसारखा ढगळ) शर्ट, साधी पादत्राणे, डोळ्यांवर साध्याच जाड फ्रेमचा चष्मा चढवलेले डॉक्टर कुणाच्या अध्यात मध्यात नाही. जरा गंभीरपणाकडेच झुकणारा स्वभाव. कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींचा विचार नाही. सुसंस्कृत आचारविचार, सभोवतालच्या माणसांना प्रभावित करणारे आणि आदबशीर सौम्य आश्वासक भाव सदैव चेहऱ्यावर; पण एकूण वागणं वावगं ना खपवून घेणारं. त्यांच्या सौम्य, शांत स्वभावाप्रमाणे सात्त्विक संतापसुद्धा पाहिलाय मी. एका सभेत एका प्रतिष्ठित पदाधिकाऱ्यानं एक अनुपस्थित महिला सदस्यासंदर्भात वापरलेला शब्द डॉक्टरांना खपला नाही. त्यांनी आक्षेप घेतला, की ती व्यक्तीही आपल्या शब्दांत चुकीचं काही नाही, असा हेका धरून बसली, तेव्हा मात्र डॉक्टरांनी रुद्रावतार धारण करून त्या पदाधिकाऱ्याला तो शब्द मागे घेण्यास भाग पाडलं. खरंतर त्या शब्दामुळे काही बिघडणार नव्हतं; पण प्रश्न तत्त्वाचा होता. 'कुसुमासारखं मृदू आणि वज्राहून कठोर म्हणजे काय याची प्रचिती आली, तेव्हा आणि डॉक्टरांच्या तत्त्वनिष्ठेचीही.

उच्चशिक्षित जबाबदार नागरिकांनी समाजकारणात यायला हवं, असं आपण म्हणतो; पण लष्कराच्या भाकऱ्या भाजायच्या कोणी? आपलं सामाजिक दायित्व स्वीकारून डॉक्टरांनी स्वत:च्या वैयक्तिक जबाबदाऱ्या सांभाळून, सामाजिक संस्थाकार्यातही सहभाग घेतला. 'कोल्हापूर मेडिकल असोसिएशन'चे ते सचिव व अध्यक्ष, तर बालकल्याण संकुलाचे आजीव कार्यकारिणी सदस्य आहेत. 'स. म. लोहिया मूकबधिर शिक्षण संस्थे'चे कार्यकारिणी सदस्य व माजी अध्यक्ष आहेत. गौड सारस्वत विद्यार्थी वसतिगृहाचे, आंतरभारती विद्यार्थी वसतिगृहाचे सदस्य आहेत. रोटरी मीडटाऊनचे इलेक्टेड प्रेसिडेन्ट होते. गार्डन क्लब आणि निसर्ग मित्रचे सदस्य आहेत. डॉक्टर नेहमी प्रसिद्धीपासून लांब राहिले. तरी अनेक पुरस्कार त्यांच्याकडे चालून आले. 'कोल्हापूर मेडिकल असोसिएशन' आणि 'जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन' तर्फे त्यांना 'लाईफ टाईम अचिव्हमेंट' ॲवॉर्ड देण्यात आले. 'एनआयएमए'कडून त्यांना 'धन्वंतरी' पुरस्काराने गौरवण्यात आले. दै. सकाळच्या वर्धापनदिनी त्यांच्या कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. २०१३ मध्ये 'व्हीटी पाटील फाउंडेशन' तर्फे प्रतिष्ठेचा 'डॉ. शोभना तावडे आरोग्यम् धनसंपदा पुरस्कार' देऊन डॉक्टरांना सन्मानित करण्यात आले.

आयुष्यभर निष्ठापूर्वक रुग्णसेवेचा वसाच जणू डॉक्टरांनी जपला. ९१ वर्षांचे डॉक्टर आता प्रॅक्टिस करत नसले, तरी २०१५ पर्यंत ५८ वर्षं त्यांनी सलग अखंड रुग्णसेवा केली.

पैसा हेच सर्वस्व होऊन बसलेल्या आजच्या झगमगाट, प्रसिद्धी आणि शोच्या कॉर्पोरेट कल्चरमध्ये डॉ. करंदेंसारख्या व्रतस्थ सेवाभावी डॉक्टरांची कहाणी वाचून, ऐकून तरुण पिढीतील एखाद्या तरी डॉक्टरला आपण 'असं काही' समाजासाठी करावं असं वाटलं, तरी माझ्या या लिखाणाचं आणि डॉक्टरांच्या जीविताचं सार्थक झालं असं म्हणता येईल. डॉक्टरांना निरामय, समाधानी दीर्घायुष्य लाभावं, हीच सदिच्छा!

**डॉ. विनोद वसंतराव घोटगे**

एखाद्याला किती निरनिराळ्या प्रकारच्या आवडी आणि छंद असावेत आणि व्यस्त दिनक्रमातही माणसानं ते कसे जोपासावे, याचा वस्तुपाठ पाहायचा असेल, तर सरळ जाऊन आमच्या कोल्हापूरच्या डॉ. विनोद वसंतराव घोटगेंना भेटावं. त्यांना किती आवडी आणि किती निरनिराळे छंद आहेत!

सावंतवाडीतील वसंतराव घोटगे हे व्यवसायाने वकील. सावंतवाडी, बेळगाव संस्थानकालीन इचलकरंजी अशा ठिकाणी त्यांनी वकिली केली. तिथं ते बराच काळ रमले. सुशिक्षित, सुसंस्कृत घरातील हसतंखेळतं कुटुंब. जणू नांदतं गोकुळच! अशा आनंदी घरात सुंदरवाडीत डॉक्टरांचा जन्म झाला ८ मे १९३८ या दिवशी. या कुटुंबात 'व' या अक्षराने सुरू होणारी नावं ठेवायची प्रथा. विठ्ठल, विनोद, विजय, विश्वास, विवेक, विक्रम व विनय हे सात भाऊ आणि त्यांची लाडाची

Saraswat™ Chamber




A powerful network to meet and interact with vibrant entrepreneurs at discussion forums, seminars, webinars and special member events.

## We strive to...

- improve networking among Saraswat entrepreneurs, professionals, community members who are in employment – locally and globally
- arrange various conferences and workshops on a diverse range of subjects organized in different cities and on virtual platforms
- build a community support system that supports business and help members seek better opportunities

**Global Chamber of Saraswat Entrepreneurs**
Registered Office:
2202, Manisha Garden, Navghar Road, Near Mulund Gymkhana, Mulund East, Mumbai 400 081 | +91 99303 50236
CIN: U85310MH2019NPL330463

www.saraswatchamber.com



**डॉ. विनोद घोटगे**

एकुलती एक बहीण वासंती. भावंडांशी खेळता खेळता शालेय शिक्षण पूर्ण झालं. पुढे वैद्यकीय शिक्षणासाठी ते पुण्याला गेले. पुण्याच्या 'बी. जे. मेडिकल कॉलेज'मधून एमबीबीएस झाले. मुंबईला जाऊन डीएही झाले. (त्यावेळी एमडी हे पीजी उपलब्ध नव्हतं.) शिक्षण तर झालं, आता पुढे काय? त्यावेळी कोल्हापूरात कुणीही भूलतज्ज्ञ डॉक्टर नव्हते. डॉ. घोटगेंच्या बरोबरचे डॉ. गुंडे, डॉ. एन. जे. पाटील, डॉ. आठल्ये हे सारे प्रॅक्टिस सुरू करायला कोल्हापुरात येणार होते. इथं आधीच सुस्थापित असलेले डॉ. वझे व डॉ. कुडाळकर या सर्जन्सनीदेखील आग्रह केला आणि डॉ. घोटगेंनी ठरवलं, आता कोल्हापूरच आपली कर्मभूमी!

१९६५ मधले ते दिवस नवपरिणीत पत्नी सुषमा यांना सांगाती घेऊन डॉक्टर कोल्हापुरात आले. बेलबागेत श्री. अतिग्रे यांच्या घरात दोन खोल्यांची जागा भाड्यानं घेतली. मंगळवार पेठेतील दादा वणकुद्रे यांच्याकडून हप्त्यानं भांडीकुंडी खरेदी केली आणि मांडला भातुकलीचा संसार. कोल्हापुरातले पहिलेच भूलतज्ज्ञ असल्यानं जम बसायला वेळ लागला नाही. सावित्रीबाई फुले हॉस्पिटल इथंही विनासायास १५०/- रुपये मानधनावर काम मिळालं, ते त्यांनी स्वीकारलं. तरुण वय आणि तडफदार वृत्ती. सकाळची ॲनेस्थेशिया प्रॅक्टिस संपल्यावर सायंकाळी जनरल प्रॅक्टिस करायचं त्यांनी ठरवलं. १९६५ मध्ये कोळेकर तिकटी इथं एका घराच्या माडीवर थाटलेलं हे 'वसंत क्लिनिक' (वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचं नाव – त्यांची शिस्त कायम अंमलात आणायची आठवण राहावी म्हणून) आजही चालू आहे आणि आजही डॉक्टर तिथे सेवा देत आहेत. लहान मुलांना ७५ पैसे आणि मोठ्यांसाठी एक रुपया ५० पैसे अशी तेव्हा त्यांची फी असे. लहान सर्जरीसाठी १० रुपये, तर मोठ्या सर्जरीसाठी ४० रुपये फी घेत. भूलतज्ज्ञ म्हणून काम करताना दोन ऑपरेशन्स स्वीकारून कधी ओव्हरलॅपिंग केलं नाही. व्यवसायाची नीतिमत्ता ढळू दिली नाही. जनरल प्रॅक्टिसमध्ये संध्याकाळची वेळ कधीच चुकवली नाही. व्हिजिट्स दवाखान्याच्या वेळेआधी किंवा नंतर केल्या. डायग्नोसिसमध्ये शंका आल्यास तज्ज्ञांना दाखवण्यात कमीपणा मानला नाही कधी. पेशंटला बिलासाठी कधी अडवलं नाही आणि दवाखान्यात बाकी स्टाफही येणाऱ्या सर्वांशी सौजन्याने वागतोय ना, याची दक्षता घेतली.

एखाद्या पेशंटच्या जिवावरचा प्रसंग उद्भवतो आणि त्यातून बाहेर पडून तो पुन्हा भेटतो, तेव्हा डॉक्टरांना कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं. एका लहान मुलीला ताप आलेला असतानाच फीट (कोनव्हुलशन) आली. एवढी तीव्र की, हृदयाचे ठोके बंद पडतात की काय अशी स्थिती होती; पण स्वत: भूलतज्ज्ञ असल्यानं गडबडून न जाता, डॉक्टरांनी कृत्रिम श्वासोच्छ्वास आणि कार्डियाक मसाज दिला. मुलगी शब्दश: मृत्यूच्या दाढेतून परत आली. पुढं मोठी होऊन ती स्वत:च्या लग्नाचं आमंत्रण द्यायला आली, तेव्हा झालेला आनंद डॉक्टरांना प्रॅक्टिसचं सार्थक करणारा वाटला; पण भूलतज्ज्ञाच्या केल्या जाणाऱ्या अवहेलनेचं डॉक्टरांना सदैव वैषम्य वाटतं. कधीकधी तर आपण ही शाखा निवडण्यात चूक तर केली नाही ना, असा विचारही मनाला स्पर्श करून जाई. ज्यांना त्यांच्या कठीण काळात मदत केली, त्यांनी दिवस पालटल्यावर पाठ फिरवणं डॉक्टरांना क्लेशदायक वाटतं.

आजन्म मेडिकल एथिक्सवर निष्ठा ठेवून काम केलेल्या मनाला पैशात शिरलेला धंदेवाईकपणा असह्य होतो. आई-वडिलांच्या संस्कारांमुळे कधीही ऋण काढून सण केला नाही. सायकलचं पायडल मारत व्हिजिट्स आणि ऑपरेशन्स अटेन्ड केली; पण कर्ज काढून स्कुटी घेतली नाही. कारण कर्ज फेडण्यासाठी अनैतिक प्रॅक्टिस करण्याची बुद्धी होऊ नये, गरज नसताना इंजेक्शन देण्याची इच्छा होऊ नये. उलट नर्स, डॉक्टर मंडळींचे आप्त, मित्रमंडळी, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हज यांची कधीही फी घेतली नाही. अपंग, कलाकार, आंतरराष्ट्रीय खेळाडू, निराधार वृद्ध अशांकडून कमीतकमी फी घेऊन उपचार केले. कारण फॅमिली डॉक्टर म्हणून आपण खूप काही कमावलं अशीच डॉक्टरांची भावना आहे. घरात केलेले विशेष पदार्थ, लोणची-पापड, दिवाळीचा फराळ, ईदचं पक्वान्न पेशंट्स प्रेमानं आणून देतात, तेव्हा श्रमसाफल्याची भावना डॉक्टरांच्या मनात दाटून येते. या व्यवसायात येणारा तणाव, मनावरचं ओझं हटवण्यासाठी डॉक्टर परिवारासोबत दरवर्षी सुट्टीवर जात. परतल्यावर नव्या जोमानं आणि उत्साहानं ते पुन्हा कामाच्या रहाटगाडग्याला जुंपून घेत, व्यावसायिक नीतिमत्तेच्या बांधिलकीतूनच त्यांनी आपल्या मुलांना (एक मुलगा आणि एक मुलगी) डोनेशन देऊन एमबीबीएसला न पाठवता होमिओपॅथीला पाठवले. स्वत: आणि स्वत:च्या परिवाराच्या संदर्भात निर्णय घेण्याची वेळ येते, त्यावेळी टिकून राहते ती खरी निष्ठा आणि खरी तत्त्वं. नाही का?

फक्त व्यवसाय आणि कुटुंब या परिघात न राहता डॉक्टर आपल्या उत्साह, ज्ञान आणि आवडीचा उपयोग विधायक

कामासाठी करत राहिले. त्यांचं अगदी आता - आतापर्यंत सतत काम आणि समाजोपयोगी उपक्रम राबवणं सुरू होतं. त्यांनी आरोग्य व्याखानमाला, कायदासल्ला शिबिर, रिक्षाचालकांसाठी मार्गदर्शन, उद्बोधन कार्यक्रम घेतले. आकाशकंदिलाचं प्रदर्शन आखलं. हेरिटेज वस्तू – स्वच्छता व डागडुजी मोहिमेत ते सहभागी होते. दरवर्षी नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांची पुण्यतिथी साजरी करत. तरुणांसाठी पन्हाळगड ते पावनखिंड साहस यात्रेचं नियोजन त्यांनी केलं. मोफत अँटीरेबीज लस देण्याचा उपक्रम राबवला. १९८६ मध्ये रायगड ते कोल्हापूर मशाल यात्रा काढण्याचा शुभारंभ डॉक्टरांनीच केला.

फोटोग्राफी आणि मित्रसंग्रह हे त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय. नवरात्रीत श्री महालक्ष्मी अंबाबाईच्या ज्या विविध पूजा बांधल्या जातात, त्यांचे फोटो स्वत: काढून डेव्हलपिंग, प्रिंटिंग, एनलार्जिंग करून भव्य प्रदर्शन भरवलं. (त्यांच्या मते हा त्यांच्या छंदाचा उत्कर्षबिंदू!) कोल्हापूर व परिसरातील ऐतिहासिक महत्त्वाच्या आणि निसर्गरम्य स्थळांची, फोटोंची शुभेच्छा पत्रं तयार करून पाठवण्याची प्रथा डॉक्टरांनीच पाडली असावी. १९८० मध्ये अशा फोटोंची विक्री करून जमवलेले जवळपास एक लाख रुपये त्यांनी कर्णबधिर मुलांच्या उपकरणासाठी खर्च करण्यासाठी शासनाकडे दिले. ३५ ते ४० वर्षं सातत्याने महिन्यातील तिसऱ्या रविवारी (एकही दिवस न चुकवता) मोफत ट्रिपल, पोलिओ, गोवर प्रतिबंधक लस/डोस देण्याचा उपक्रम एकहाती राबवला. (हे सारं 'दो बुंद जीवन के' या शासकीय मोहिमेच्या कितीतरी आधीपासून.) आजवर पंचवीस हजारांहून अधिक लसी देऊन झाल्या आहेत. 'अल्कोहोलिक ॲनानिमस' या आंतरराष्ट्रीय संघटनेची शाखा कोल्हापूरात सुरू करून काही जणांना व्यसनमुक्त करण्यात यश मिळवले आणि निदान तशी प्रामाणिक धडपड आपण केली, याचं मोठं समाधान डॉक्टरांना वाटतं.

डॉक्टरांना समाजाची आणि समाजसेवेची ओढ तितकीच माणसाचा 'सच्चा दोस्त' कुत्रा पाळण्याची हौस. उत्तम पेडिग्रीचा जर्मनशेफर्ड श्वान ते पाळतात. टिपिकल मासे पाळून त्यांची निगा राखायलाही आवडते. स्वत:ची राहणी अगदी साधी विशेष लवाजमा वगैरे काही नाही. साधा शर्ट-पँट, पायात चपला आणि डोळ्यांवर चष्मा. अगदी अलीकडे हनुवटीवर दाढी तेवढी ठेवलेली दिसते; पण वेगवेगळ्या मॉडेल्सच्या गाड्या घेण्याचा शौक त्यांना आहे. एके काळी सगळीकडे सायकलवरून फिरणाऱ्या डॉक्टरांनी मात्र भारतीय आणि तीन विदेशी गाड्या स्वकर्तृत्वावर खरेदी करून मनसोक्त पर्यटन आणि निसर्ग भ्रमंतीचा आनंद लुटला आहे.

माणसाची श्रीमंती त्याच्या स्थावर-जंगम मालमत्तेवरून मोजायची नसते, तर ती मापायची असते, त्याने जोडलेल्या माणसांवरून. गेली ३० वर्षं, म्हणजे मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यापासून डॉक्टरांचे जे जे मित्र झाले, त्यांच्याशी मैत्रीचे संबंध आजही टिकून आहेत. (सगळे आपापल्या प्रॅक्टिसमध्ये स्थिरावल्यानंतर असेल बहुधा.) नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात या मेडिकल कॉजलेमधल्या मित्रांचं एक संमेलनच भरतं जणू. महाराष्ट्र–गुजराथ– गोवा – कर्नाटक –जिथं यांपैकी एखादा मित्र स्थायिक आहे, अशा एखाद्या शहरात/गावात हा मित्र-मेळावा भरतो. पुढाकार अर्थात डॉक्टरांचा असतो. आज फेसबुक–इंटरनेट आहे, व्हॉट्सॲप ग्रुप आहेत; पण हे सारं उपलब्ध नव्हतं, तेव्हा दूरदूरच्या सर्वांना एकत्र आणून नियोजन करणं हा मोठाच व्याप असे. या मेळाव्यांचे वैशिष्ट्य म्हणजे (आजच्या जमान्यात अशक्यप्राय वाटेल) धूम्रपान नाही, मद्यपान नाही, मोबाईलचा वापर आणि वर्तमानपत्र नाहीत; शिवाय पेशंट्स आणि व्यवसाय याबद्दल अवाक्षरही काढायचं नाही. इथं जमायचं ते फक्त मित्र म्हणून. व्यावसायिक यशापयश, संपन्नता, सामाजिक प्रतिष्ठा आणि पद बाजूला ठेवून फक्त जुन्या आठवणींमध्ये हरवून जायचं. पुन्हा १८-२० वर्षांचं वय असल्यासारखं 'विन्या', 'पिंपळ्या', 'मध्या' अशा हाका मारायच्या. गप्पा-गोष्टी, हास्यविनोद, संगीताच्या साथीनं पुन्हा तरुण व्हायचं आणि पुन्हा पुढील वर्षी भेटण्यासाठी तात्पुरतं एकमेकांना 'अलविदा' करायचं.

डॉक्टरांनी हे भेटीगाठी प्रकरण फक्त मित्रांपुरतं मर्यादित नाही ठेवलेलं, तर सावंतवाडीला मूळ घरी दरवर्षी दीड दिवसाचा गणपती बसतो. तिथं सारा गोतावळा जमतो. गजाननाच्या साक्षीनं गळाभेटी होतात. आरत्या म्हणून, नैवेद्य दाखवून आवडीचे पदार्थ झोडले जातात. विसर्जनानंतर सगळे मिळून गोव्यात कुलदैवताच्या दर्शनाला जातात. मुलाबाळांच्या क्षेमकल्याणाचं मागणं मनोभावे मागतात. आजोळी वेंगुर्ल्याला जाऊन पाण्यात डुबतात. दर्याकिनारी धमालमस्ती करतात. खरंच गाडी काय आणि नाती काय त्यांना तेलपाणी आणि देखभालीचं – भेटी आणि सहवासाचं वंगण हवंच ना! भेटीगाठींच्या या वंगणानं नातीगोती न कुरकुरता टिकून राहतात. सदैव माणसांसारखीच वास्तू आणि वास्तूंनाही प्रेम, सहवास आणि जपणूक हवी असते. सावंतवाडीतील डॉक्टरांचं मूळ घर १०० वर्षांचं झालं, तेव्हा घराची शंभरी साजरी करायची ठरलं. डॉक्टरांच्या पुढाकारानं

भांडीकुंडी, बिछाने, मंडपसाहित्य इथून कोल्हापुरातून नेऊन एखाद्या लग्नासारखा समारंभ साजरा झाला. अहो, चक्क आपल्या मुलीचं लग्नच लावलं डॉक्टरांनी तिथं. चार-पाच दिवस समस्त घोटगे परिवारातील ८०-८५ जण मुक्कामाला होते त्या मांडवात. पूर्वीचे दिवस आठवून किती गहिवरलं असेल ते घर! ज्यांची नाळ जोडलेली आहे, त्यांनी आणि त्यांच्या पुढच्या पिढ्यांनी येऊन आपल्या अंगाखांद्यावर नव्यानं खेळण्याचा तो अनुभव किती रोमांचक असेल त्या वास्तूसाठीसुद्धा.

कर्मभूमी, जन्मभूमी, या मातीवर, निसर्गावर, इतिहासावर आणि साऱ्याच 'सुंदरते'वर प्रेम करणाऱ्या डॉक्टरांची जीवनसाथी मात्र जीवनप्रवासामध्ये त्यांना अर्ध्या वाटेवर सोडून गेली. मोठ्या प्रयासानं खचलेले डॉक्टर मुलानातवंडांमध्ये आपलं दु:ख बाजूला सारून रमले आहेत. मुलगा डॉ. वल्लभ उत्तमरीत्या प्रॅक्टिस सांभाळतो आहे. तरीही डॉक्टर रोज स्वत:सुद्धा क्लिनिकमध्ये जातात. पेशंटची तपासणी आणि औषधोपचार करतात. हेच त्यांचं 'जीवन टॉनिक' असावं बहुधा. असं टॉनिक त्यांना सदैव, निरंतर लाभो, हीच सदिच्छा!

*- लेखिका सामाजिक कार्यकर्त्या असून लेखनही करतात.*
*संपर्क - ९८८१२०४०५०*

अभिनंदन

## सानिकाचे उज्ज्वल यश!




सानिका अमित कंटक हिने एमबीबीएसच्या अंतिम परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे.

सानिकाला अभ्यासाबरोबर चित्रकला व नृत्य इत्यादी छंद जोपासण्याची आवड आहे. तिने मिळवलेल्या या यशाचा कंटक व भांडारकर परिवारांस सार्थ अभिमान आहे.

सानिकाला तिच्या पुढील वाटचालीसाठी सारस्वत परिवारातर्फे मनःपूर्वक शुभेच्छा!

YASHAM
YASHAM SPECIALITY INGREDIENTS PVT LTD
Industries Catered

PERSONAL CARE
FOOD AND NUTRACEUTICALS
VETERINARY
CONSTRUCTION
PHARMACEUTICAL
BEYOND CHEMICALS BUILDING PARTNERSHIP
YASHAM SPECIALITY INGREDIENTS PVT LTD
401, Satya Dev, Plot No A-6, Veera Industrial Estate, Off Veera Desai Road, Andheri (W), Mumbai - 400 053
**Tel.:** 91-22-4063 9900, **Fax:** 91-22-4063 9901, **Email :** yasham@yasham.in, **Website :** www.yasham.in
*We encourage your research & help sourcing your new requirements*


BizCare.
ARE YOU LOOKING FOR MIDC PLOTS / INDUSTRIAL GALAS IN MAHARASHTRA ?
OUR SERVICES
MIDC Plot Allotment
Resale of Plots / Galas
MIDC Plot Transfer Approvals
Consent to Mortgage ( Loan related approvals )
All permissions under MIDC, MPCB
Government Subsidies & Incentives
www.bizcareadvisors.com
Contact Dhananjay Deshmukh
deshmukh@bizcareadvisors.com
+91 9307975854
Prosperise
BUSINESS CONSULTANCY LLP
START YOUR BUSINESS IN DUBAI (UAE)
Options for incorporating companies
Dubai Mainland Company
Free Zone Company
Offshore Company
www.prosperise.in
Contact Rohan Tendulkar
rohan@prosperise.in
+91 7738990548
1, Matruchaya, GV Scheme Road No 1, Mulund East, Mumbai- 400081

# सिंधुदुर्गचे माणिकमोती



डॉ. बाळकृष्ण लळीत

## वेंगुर्ले येथील ज्येष्ठ कलाशिक्षण तज्ज्ञ व प्रशासक - पद्मश्री विष्णू उर्फ दादासाहेब नामदेव आडारकर

**इंग्रजी राजवटीत आपल्याला विलायतेला गेलेल्या राजकीय नेत्यांची नावे सहजपणे सांगता येतात; पण अन्य क्षेत्रात ज्ञान प्राप्त करण्यासाठी असंख्य भारतीय तरुण युरोपकडे जात होते. त्यांपैकी एक होते विष्णू नामदेव आडारकर. त्याकाळात त्यांनी कलाशिक्षणपद्धतीचा सखोल अभ्यास केला आणि पुन्हा भारतात परतले. त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा थोडक्यात घेतलेला आढावा...**

काही वर्षांपूर्वी, म्हणजे २०१४ साली एक वृत्त वाचनात आले - 'वेंगुर्लेचा नामदेव आडारकर 'सिंधुदुर्ग केसरी'चा मानकरी. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कासार्डे येथे पार पडलेल्या सिंधुदुर्ग जिल्हा 'सिंधुदुर्ग केसरी' स्पर्धेतील मानाचा 'सिंधुदुर्ग केसरी २०१४'चा किताब वेंगुर्लेचा मल्ल नामदेव आडारकरने पटकावला.'

...हे वृत्त वाचल्यावर मला आनंद झाला; पण हा आनंद होण्यामागे आणखी एक कारण होते. ते म्हणजे, मला या नावावरून भारतीय रिझर्व्ह बँकेचे नववे गव्हर्नर भास्करराव नामदेव आडारकर आठवले. त्यांचे मोठे बंधू भैय्या आडारकर. तसेच ज्येष्ठ कलाशिक्षणतज्ज्ञ पद्मश्री विष्णू नामदेव आडारकर उर्फ प्रख्यात चित्रकार, कला शिक्षणतज्ज्ञ दादा आडारकर यांची कारकीर्द आठवली. समाजमाध्यमांवर शोध घेतल्यावर 'विवेक - महाराष्ट्र नायक' सदरातील रंजना जोशी व दीपक घारे यांनी लिहिलेला एक लेख उपलब्ध झाला. या लेखाच्या आधारे यांचे कार्य कर्तृत्व समजावून घेऊ या.

***

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आडाळी, आडेली, आडारी अशी नामसदृष्य असलेली गावे, वाड्या आहेत. त्यांपैकी आडाळी हे दोडामार्ग तालुक्यात येते, तर एक 'आडारी' मालवण जवळ आंगणेवाडीला जाताना वाटेत 'कोळंब'नावाचे खाडीकाठी एक प्रसिद्ध गाव आहे. तेथेही 'आडारी' आहे; पण ती कोळंब गावची 'वाडी' आहे आणि देवगड जवळच्या मिठबांवलाही एक 'आडारी' आहे.

***

'वेंग मारून उरले ते वेंगुर्ले!'

दक्षिण कोकणातील सागर किनाऱ्यावरील एक निसर्गरम्य, प्रतिष्ठित आणि साहित्य, कला, सांस्कृतिक दृष्टीने मला नेहमीच अभिमान वाटतो असे गाव. वेंगुर्लेहून शिरोडा रस्त्याने जाताना लगेचच उजवीकडील 'मानसीश्वर' मंदिरानंतर साधारणपणे एक किमी अंतरावर हेळेकर मंदिर लागते. उभा दांडा हेळेकर मंदिरकडून डाव्या बाजूने आडारीवाडी रस्त्याने आडारीवाडीत गेल्यावर उजव्या बाजूला प्राचीन विठ्ठल मंदिर आहे. डाव्या बाजूला सुंदर प्रसिद्ध निसर्गरम्य 'आडारी तलाव' आणि तलावाच्या काठावर श्री ब्राह्मण देव मंदिर आहे. तसेच देवी कुलस्वामिनीचे मंदिर आहे आणि जवळच 'आडारकर' आडनावाची कुटुंबे गेली अनेक वर्षे इथे वास्तव्य करून राहातात. यांपैकी एक नामदेव आडारकर यांचं घर. या घरात आज आपण परिचय करून घेणार आहोत, त्या पद्मश्री विष्णू उर्फ दादा आडारकर यांचा २३ ऑगस्ट १९०८ या दिवशी जन्म झाला. भारतीय रिझर्व्ह बँकेचे नववे गव्हर्नर भास्करराव त्यांचेच धाकटे बंधू! (जन्म, १८मे १९१०) आणि सर्वांत वडीलबंधू भैय्यासाहेब. सारस्वत बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीरंग आडारकर हेही याच कुटुंबातील होत.







***

**महाराष्ट्र राज्याचे पहिले कलासंचालक :**

विष्णू नामदेव उर्फ दादा आडारकर यांचा जन्म २३ ऑगस्ट १९०८ रोजी वेंगुर्ले येथे झाला. शालेय शिक्षण घेतानाच उपजत असलेल्या चित्रकलेची आवड अधिक विकसित होत गेली. पुढील शिक्षणासाठी त्यांना मुंबईत जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'मध्ये प्रवेश मिळाला. शिक्षण घेताना अनेक पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विष्णू यांनी १९३०साली रंगचित्रकलेतील पदविका मिळवली.

***

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एका खासगी संस्थेत नोकरी मिळवली. त्या काळात कोकणातून गेलेल्या प्रत्येक तरुणाला मुंबईत स्थिर होण्यासाठी थोडेसे शिक्षण घेतल्यावर नोकरी पत्करावीच लागत असे; पण कलेच्या जन्मभूमीत जन्मलेल्या प्रत्येक तरुण नोकरीवर समाधान न मानता आपले ध्येय गाठण्यासाठी पराकाष्ठा करत असे. १९३२ साली त्यांनी 'टाईम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्रात वरिष्ठ चित्रकार म्हणून काम पाहिले. त्यांची या क्षेत्रातील गुणवत्ता पाहून जेथे ते शिकले, त्याच जे. जे. आर्ट स्कूलमधून उपसंचालक म्हणून निवृत्त झाले.

***

**लंडनला रवाना :**

इंग्रजी राजवटीत आपल्याला विलायतेला गेलेल्या राजकीय नेत्यांची नावे सहजपणे सांगता येतात; पण अन्य क्षेत्रात ज्ञान प्राप्त करण्यासाठी असंख्य भारतीय तरुण युरोपकडे जात होते. त्यांपैकी एक होते विष्णू नामदेव आडारकर. १९४६ ते १९४७, ते इंग्लंडला होते. तेथे त्यांनी कलाशिक्षणपद्धतीचा सखोल अभ्यास केला व पुन्हा भारतात आले.

***

**विष्णू नामदेव आडारकर कलाशिक्षणतज्ज्ञ आणि प्रशासक :**

या संदर्भात रंजन जोशी व दीपक घारे यांनी अत्यंत कष्ट घेऊन लिहिलेला एक लेख उपलब्ध आहे. त्यात ते लिहितात -

'महाराष्ट्र राज्याचे पहिले कलासंचालक आणि उपयोजित कलाशिक्षणाचे प्रवर्तक विष्णू आडारकर हे कोकणातील वेंगुर्ले येथून चित्रकलेची आवड असल्याने मुंबईत आले आणि त्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेतला. जे. जे.मध्ये शिकत असताना त्यांना अनेक पारितोषिके मिळाली. १९३० साली त्यांनी रंगचित्रकलेतील (पेंटिंग) पदविका संपादन केली आणि 'एलए स्ट्रोनॅक अँड कंपनी' या जाहिरात संस्थेत ते रुजू झाले.

पुढे इंग्लंडहून आल्यावर १९४६ ते १९५८ या काळात उपयोजित कला (अप्लाइड आर्ट) या विभागाचे ते प्रमुख होते. १९५८ मध्ये 'सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट' ही स्वतंत्र संस्था स्थापन झाली व १ जानेवारी १९६१पासून या संस्थेचे अधिष्ठाता (डीन) म्हणून आडारकरांची नेमणूक झाली.'

या लेखात पुढे म्हटले आहे, 'महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर १९६५ मध्ये कलासंचालनालयाचे कलासंचालक (आर्ट डायरेक्टर) म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. ऑगस्ट १९६८ मध्ये ते या पदावरून निवृत्त झाले. १९६९ साली आयआयटी पवई येथे आयडीसी (इंडस्ट्रिअल डिझाइन सेंटर) ची स्थापना झाली. पहिली पाच वर्षे आडारकर आयडीसीचे सल्लागार होते.'

'आडारकरांकडे कलेच्या बदलत्या स्वरूपाचा आणि तिच्या समाजाभिमुखतेचा वेध घेणारी दूरदृष्टी आणि सर्वांना बरोबर घेऊन काम पूर्णत्वास नेण्याची हातोटी होती. प्रशासकीय अनुभवाबरोबरच सरकार दरबारी त्यांचे वजन होते. त्यामुळे जे. जे.चा उत्कर्ष झाला आणि कलावंतांना





प्रतिष्ठा प्राप्त झाली. शासकीय योजना, सामाजिक विकासाबाबतची ध्येय-धोरणे यांचा प्रसार करण्यासाठी जे. जे.सारख्या कलासंस्थांचा उपयोग करून घेतल्यामुळे चित्रकारही समाजाचा क्रियाशील घटक बनले. १९३५ साली चार्ल्स जेरार्ड यांच्या कारकीर्दीत 'कमर्शियल आर्ट'चा विभाग सुरू झाला खरा; पण व्यावसायिक (कमर्शियल) आणि नंतर उपयोजित (अप्लाइड आर्ट) विभागाचे संवर्धन आडारकरांनी केले.' 'याच काळात औद्योगिक उत्पादनांमुळे आडारकरांच्या काळात जाहिरात क्षेत्राचा विस्तार झाला. १९६० साली 'सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट'ला पंचवीस वर्षे पूर्ण झाली. त्या वर्षीच्या 'शिल्पांजली'च्या विशेषांकात आडारकर यांनी 'इंडस्ट्रियल डिझाईन ट्रेनिंग सेंटर' सुरू करण्याचा विचार मांडला होता. प्रत्यक्षात 'महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा (वडोदरा)' आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन (एनआयडी)' येथे अशा प्रकारचे अभ्यासक्रम सुरू झाले. त्यानंतर मुंबईत आडारकरांच्या पुढाकाराने आयडीसी सेंटर सुरू झाले. या कलाशिक्षणाच्या विकासात आडारकरांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग होता.

आज जो दृक्-संवादकलेचा जाहिरात कला, उपयोजित कला, संकल्पन (डिझाइनिंग) अशा क्रमाने विस्तार झाला आहे, त्याला पूरक अशा कलाशिक्षणाचा पाया विष्णू आडारकर यांनी घातला. आडारकर इंग्लंडला जाऊन आल्यानंतर कलाशिक्षण या विषयावर त्यांनी लिहिलेला अहवाल शासनातर्फे प्रकाशित करण्यात आला. 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट अँड डिझाइन, लंडन' येथे ते पहिले 'ऑनररी लाइफ फेलो' होते.'

(साभार - रंजन जोशी आणि दीपक घारे यांचा लेख)

***

१९६५ साली त्यांना भारत सरकारतर्फे 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला. मुंबईत १३मे १९९४ साली त्यांचे निधन झाले.

पद्मश्री पुरस्काराने सन्मानित दादा आडारकर यांनी काढलेली काही चित्रे समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत.

***

जाता जाता -

अनेकांना हे माहिती नसेल की विष्णू उर्फ दादा यांची आत्ये म्हणजेच वडील नामदेव आडारकर यांची चुलत बहीण तापीबाई या बॅ. नाथ पै यांच्या मातोश्री होत. वडील नामदेवराव महात्मा गांधींचे अनुयायी होते. शिरोडा येथे झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात त्यांनी एका तुकडीचे नेतृत्व केले होते!

वाचकहो, हे कदाचित साधे-साधे संदर्भ देऊन मी आपला वेळ खात आहे, हे मला समजते; तरीपण त्या काळाचा विचार केला, तर या माहितीला फार महत्त्व आहे, असे मला वाटते. याच आडारीवाडीत जन्मलेले बी. पी. आडारकर यांचा पंडित नेहरूंशी परिचय होता. अर्थशास्त्राचे अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे ग्रंथ त्यांनी लिहिले. या सर्व आडारकर मंडळींवर एक ग्रंथ तयार होईल!

**संदर्भ -**


१. रंजन जोशी व दीपक घारे यांचा लेख (विवेक महाराष्ट्र नायक)

२. विशेष आभार- श्री. बाळा कुडाळकर, मा. मधुसुदन साळगावकर.


***


- लेखक हे पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात असणाऱ्या चां. ता. महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

संपर्क - ९६६५९९६२६०

सार्व.न्यास.नों.क्र.: के.ए.११६/को. 'ज्ञानसेवा' स्थापना : २०/०५/१९१५

# श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह

२९६४, सी वॉर्ड, दसरा चौक, फोन नं. ०२३१-२६४४१११, कोल्हापूर ४१६ ००२.

Email : saraswatboardingkolhapur@gmail.com Website : www.saraswatboarding.org

- राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी, ग्रामीण भागातील हुषार व होतकरु विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची संधी मिळावी म्हणून १०७ वर्षापुवी दिलेली जागा व आर्थिक पाळबळ आणि दातृत्वाचा व मातृत्वाचा मानदंड असलेल्या मातोश्री कै.श्रीमती सरस्वतीबाई लाटकर यांच्या उदार देणगीतून बांधलेल्या वसतिगृहाचे उद्घाटन राजर्षींच्या हस्ते दिनांक २० मे, १९१५ रोजी झाले आणि अनेक स्थित्यंतरे पहात हां हां म्हणता वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांना पूर्वसुरीनी दिलेल्या संधीचे अक्षरशः सोने केले काहीनी तर आपल्या कुटुंबाचे, बोर्डींगचे तसेच देशाचे नाव जागतिक पातळीवर उंचावले.

## संस्थेची ठळक वैशिष्टये

- सर्व आधुनिक सोयीनियुक्त अशा वसतिगृहात गुणवत्तेनुसार १०६ विद्यार्थ्यांसाठी माफक फीमध्ये प्रवेश.
- सारस्वत विद्यार्थ्यांना तसेच इतर समाजातील आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना फीमध्ये ५० टक्के सवलत.
- पिण्यासाठी शुध्द पाणी व अंघोळीसाठी गरम पाणी.
- अभ्यासिका, ग्रंथालय, ई लायब्ररी, प्रशस्त सभागृह इ. सुविधा
- निवासी विद्यार्थ्यांकरिता प्रबोधनपर मार्गदर्शक व्याख्याने, आरोग्य तपासणी, स्नेहसंमेलन, क्रिडा महोत्सव, राष्ट्रीय सण व गणेशोत्सव सारखे कार्यक्रम.
- वसतिगृह प्रांगणात ओपन जीम (खुली व्यायामशाळा) सुविधा.
- **वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर निवासी शिष्यवृत्ती.**

## शैक्षणिक शिष्यवृत्ती :

१. कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या चार जिल्हयातील सारस्वत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, पारितोषिके आणि संशोधनासाठी अर्थसहाय्य

२. उच्च शिक्षणासाठी परतफेडीची शिष्यवृत्ती.

३. सारस्वत मान्यवरांनी संस्थेकडे दिलेल्या पुरस्कृत ठेवींवरील व्याजातून सारस्वत गुणवंत, तसेच गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना पारितोषिके.

QR CODE

### संस्थेचे बँक खाते

श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह
स्टेट बँक ऑफ इंडिया,
शाखा : दसरा चौक, कोल्हापूर
बँक खाते क्रमांक : १०९६७००३५९८
IFSC Code : SBIN0000413

## विश्वस्त मंडळ

**पदाधिकारी**

अध्यक्ष – श्री.मोहन नारायण देशपांडे

उपाध्यक्ष – श्री.सिध्दार्थ मनमोहन लाटकर

मा.सचिव – श्री.सुधीर चिंतामण कुलकर्णी

सहसचिव – श्री.अमित अरुण सलगर

**विश्वस्त**

श्री.संजय उर्फ बाबा पांडूरंग वाघापूरकर
डॉ.गजानन गोपाळ आसगेकर
ॲड.धनंजय रघुनाथ देशपांडे
श्री.संजीव राजाराम बोरकर
श्री.सचिन रामकृष्ण शानभाग

टीप – ज्या समाजबांधवाना वसतिगृहासाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी मा.सचिव यांचेशी संपर्क साधावा व देणगी रक्कम दिलेल्या QR कोड द्वारे संस्थेच्या खातेवर जमा करुन सहकार्य करावे.
(संपर्क :– श्री.सुधीर चिंतामण कुलकर्णी, मा.सचिव, फोन ०२३१–२६४४१११, मो.नं. ९९२१४३४९६४)



सार्व.न्यास.नों.क्र.एफ–५२४ स्थापना : १२/०६/१९७५

# सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर

२९६४, सी वॉर्ड, दसरा चौक, कोल्हापूर ४१६ ००२. फोन नं. ०२३१–२६४४१११,

Email : saraswatvikasmandalkolhapur@gmail.com

वसतिगृहाच्या स्थापनेनंतर पुढील काळामध्ये अनेक सामाजिक स्थित्यंतरे झाली. ज्याचा प्रभाव समाजावर पडून जीवनशैली, कुटुंबव्यवस्था, सामाजिक गरजांमध्ये बदल दिसू लागले. वसतिगृहासाठी काम करत असताना समाजधुरीणांना शिक्षणाव्यतिरिक्त इतरही सामाजिक गरजा व अडचणी लक्षात आल्या. सदर अडचणींचे निराकरण करणेसाठी व्यापक हेतूने कार्यरत संस्थेची गरज भासू लागली, म्हणून सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर या संस्थेची स्थापना करणेत आली. ही संस्था विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे पार पाडत आहे.

## सामाजिक कार्यक्रम

- दरवर्षी २६ जानेवारी रोजी तिळगूळ, हळदीकुंकू व वाण वाटप समारंभ, बालकांचे बोरन्हाण, वेशभूषा स्पर्धा, ज्येष्ठ सदस्यांचा सत्कार इ.

## सांस्कृतिक कार्यक्रम :

- सामुदायिक गणेशोत्सव या कार्यक्रमातून समाज बांधवांना एकत्र आणणे व आपसातील वैचारिक, सामाजिक देवाण–घेवाण वाढवणे, यावर भर दिला जातो. संस्थेवरील समाजबांधवांचा जिव्हाळा वाढावा याकडे खास लक्ष दिले जाते. सदर कार्यक्रम उत्साहात साजरा केला जातो.
- हीच वेळ साधून मुलांसाठी निरनिराळ्या स्पर्धा व विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजला जातो.
- गणेश विसर्जनाचे दिवशी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

## कौटुंबिक कार्यक्रम

वधूवर व पालक परिचय मेळावा समाजातर्फे वधूवर सूचक केंद्र चालवले जाते. दर महिन्यांच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये वसतिगृहातील अभ्यासिकेत वधूवर नोंदणी व वधूवर विषयक माहितीची देवाण–घेवाण केली जाते. प्रतिवर्षी पाच वधूवर पालक परिचय मेळावे घेतले जातात. या मेळाव्यांची तसेच इतर माहिती ९११२० ४१९७५ या व्हॉटस्अप क्रमांकाद्वारे देणेत येते. मेळाव्यातील उपस्थितांसाठी अल्पोपहार व चहापानाची विनामूल्य व्यवस्था केली जाते. नोंदणीसाठी वार्षिक शुल्क रु.३००/– घेतले जाते. मेळाव्यात सहभागी होणेसाठी वेगळे शुल्क आकारले जात नाही. मेळाव्यास मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते. सदर मेळाव्याच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक विवाह संपन्न झाले आहेत.

## सारस्वत विकास मंडळ (विश्वस्त मंडळ)

श्री. सचिन उर्फ कल्याण मंगेश जनवाडकर – अध्यक्ष
श्री. संजीव. रा. बोरकर – उपाध्यक्ष
श्री. मुकुंद. म. कुलकर्णी (गुंजीकर) – सचिव
अँड. शरद खासनीस – सहसचिव
श्री. गुरुनाथ. वि. देशपांडे – खजिनदार
श्री. गिरीश घोलकर – विश्वस्त
श्री. सुधीर. चिं.कुलकर्णी – विश्वस्त
श्री. दिपक देशपांडे – विश्वस्त
श्री. सुनील होळणकर – विश्वस्त,
श्री. विठ्ठल कुलकणी – निमंत्रित
सौ. माधवी देशपांडे – निमंत्रित

QR CODE

### संस्थेचे बँक खाते

सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर
कॅनरा बँक लक्ष्मीपुरी शाखा, कोल्हापूर
बँक खाते क्रमांक : ०३०४१०१००५२७९
IFSC Code CNRB0000304

टीप – ज्या समाजबांधवाना संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमासाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी मा. सचिव यांचेशी संपर्क साधावा व देणगी रक्कम सोबत दिलेल्या QR कोड द्वारे संस्थेच्या खातेवर जमा करुन सहकार्य करावे. (संपर्क :– श्री. मुकुंद कुलकर्णी (गुंजीकर) सचिव मो.नं. ९४०४७००८२०)

# बांधण आंबेपूरचे रगेल, रंगेल आणि रसिक सारस्वत!



रमेशचंद्र तेंडुलकर

**लेखाचे शीर्षक जरी 'बांधण आंबेपूरचे सारस्वत' असले तरी यामध्ये बांधण आंबेपूर परिसरातील पोयनाड आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीतील गावांचा समावेश आहे. बांधण आंबेपूर या जोड नावाच्या व्युत्पत्तीबद्दल मला कुतूहल होते. गावात पाच-सहा पिढ्या वास्तव्य असलेल्या गिरीश वाकडे यांनी मला यासंबंधी दिलेली माहिती मोलाची वाटली. म्हणून हा लेख प्रपंच...**

रायगड जिल्ह्यातील बांधण आंबेपूर ता. अलिबाग हे माझे आजोळ. १९४२ ते १९४७ हा देशातील महत्त्वाच्या घटनांचा आणि धामधुमीचा काळ! देशाचे स्वातंत्र्य अगदी उंबरठ्यावर आले होते. त्याकाळी मुंबईत वारंवार उद्भवणाऱ्या दंगलीमुळे काही जणांनी राहत्या जागा सोडून आपली कुटुंबे गांवाकडे पाठविली होती. पहिली पळापळ, दुसरी पळापळ असे शब्द नेहमी कानावर पडायचे. त्याचा संदर्भ बहुधा स्वातंत्र्य चळवळीत होणाऱ्या जातीय दंगलींशी असायचा. या सर्व पार्श्वभूमीचा उल्लेख एवढ्यासाठी की मी जन्मजात मुंबईकर असूनही १९४६ च्या सुमारास ३/४ वर्षांचा असताना मुंबईत होणाऱ्या दंगलीमुळे आमचे कुटुंब बांधण आंबेपूर गावात आले होते. प्रथम पोयनाड येथील खपाच्या वाडीत चार-सहा महिने होतो. त्यानंतर बांधण येथे श्रीमती जानकीबाई किनरे यांच्या घरी वास्तव्याला आलो. पुढे रामराव केळकर यांच्या वाड्यात आणि वर्षभरानंतर तेथून नाना केळकर यांच्या घरात राहायला आलो. असे बांधण आंबेपूर येथे माझे सुमारे सहा वर्षे वास्तव्य झाले.

पोयनाड ही आजूबाजूच्या पाच-पन्नास गावांची मध्यवर्ती बाजारपेठ होती. बाजारासाठी आम्ही तेथे जायचो. त्यावेळी गावात वीज नव्हती. घासलेटचे कंदील, काचेच्या चिमण्या किंवा बंद बाटलीचे काकडे लावले जायचे. आम्ही दोघे भाऊ या दिव्याच्या उजेडातच अभ्यास करायचो. असा हा बालपणीचा निरागस रम्य काळ. कोणत्याही गोष्टीचा गंभीरपणे विचार नव्हता; पण आजूबाजूला घडणाऱ्या घटना, चर्चा, गप्पागोष्टी फक्त पाहायच्या, ऐकायच्या आणि आपल्या परिने (काही वेळा चुकीने) त्याचा अर्थ समजून घ्यायचा!

बांधण आंबेपूर या जोड नावाच्या व्युत्पत्तीबद्दल मला कुतूहल होते. गावात पाच-सहा पिढ्या वास्तव्य असलेल्या गिरीश वाकडे यांनी मला यासंबंधी दिलेली माहिती मोलाची वाटली. पेशवाईच्या अस्तानंतर त्या काळातील कर्तबगार व्यक्ती राजाश्रया अभावी विखुरल्या गेल्या. त्यामधील रत्नागिरी जिल्ह्यातील आडिवरे गावातील श्री. काशिनाथ वाकडे यांचे कुटुंबीय प्रथम कर्जत जवळील पळसदरी येथे आले. तेथून ते पोयनाड येथे आले आणि इतर समाज बांधवांसमवेत जवळच्या बांधण गावात त्यानी वस्ती केली. पेझारी-आंबेपूर हा भाग अंबा नदीच्या दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे उध्वस्त होत असे. पावसाळ्यात या गावात येणाऱ्या पुरापासून संरक्षण करण्यासाठी ग्रामस्थांच्या मदतीने धरण बांधण्यात आले. धरण बांधल्यामुळे गावाचे नाव 'बांधण' झाले. नदीच्या पलीकडे शिवादेवीचे मंदिर होते. पलीकडील भाग म्हणजे 'वरचे बांधण' आणि अलीकडे 'खालचे बांधण' म्हणून ओळखले जाऊ लागले. अंबा नदीचा शेजार, रायवळ आंब्याचे गाव आणि नदीवर बांधलेले धरण अशी ही एकत्रित व्युत्पत्ती म्हणजे 'बांधण आंबेपूर'! श्री. काशिनाथ वाकडे यांची समाधी वाकडे कुटुंबीयांच्या मूळ घरात आहे, तेथे पुण्यतिथीला उत्सव साजरा केला जातो.

लेखाचे शीर्षक जरी 'बांधण आंबेपूरचे सारस्वत' असले तरी यामध्ये बांधण आंबेपूर परिसरातील पोयनाड आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीतील गावांचा समावेश आहे. येथे सारस्वत हा शब्द प्रामुख्याने भालावलीकर सारस्वतांना समोर ठेवून वापरला आहे. कारण त्यांची बहुसंख्या होती; पण रत्नागिरीच्या गावांतून स्थलांतर करताना त्यांनी त्याकाळात संपूर्ण समाजगाडा आणला होता. यामध्ये पौरोहित्यासाठी ब्राह्मण, तसेच अन्य समाजबांधवांचाही

With Best Compliments from

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना

यज्ञो यज्ञेन कल्पताम्

या ब्रह्माच्युत शंकरप्रभुतिभि दैवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा

# ALL INDIA SARASWAT CULTURAL ORGANISATION

## Joining Hands in Harmony

The organisation aims at progressive goals and objectives
to promote Cultural, Educational and
Socio – Economic activities for the Saraswats

**President**
Dr. Ajit Gunjikar

**Vice Presidents**
Subhash Saraf Girish Joshi Girish Pikale Ulhas Kamat

**Secretaries**
Rajendra Pai Uday Redkar

**Treasurer**
Ramnath Juwarkar

Botawala Bldg., Sitaladevi Temple Rd., Mahim, Mumbai – 400016.
Website: www.aisco.org.in Email - office.admin@aisco.org.in

समावेश होता.

बांधण गाव जरी लहान असले, तरी दाटीवाटीने वसलेले होते. माझ्या आठवणीप्रमाणे केवळ हाकेच्या अंतरावर पाचपन्नास घरे होती. गावातले वातावरण तसे शांतताप्रिय आणि धार्मिक होते. ओगले मास्तरांच्या घरासमोरून सकाळी शाळेत जाताना हमखास भुपाळ्यांचे स्वर कानावर पडायचे. सीमेवर शिवादेवी, वाकडे कुटुंबीयांचे गणेश मंदिर आणि सिनकरांचे दत्तमंदिर अशी तीन देवळे होती. मुख्यतः चैत्रातील 'रामनवमी' आणि 'माघी गणेश जयंती'चा उत्सव गावात मोठ्या उत्साहात साजरा होत असे. रामनवमीचा उत्सव जरी सिनकर कुटुंबीयांचा असला, तरी आजही गावात अतिशय उत्साहाने साजरा होतो. माघी गणपतीचा उत्सव वाकडे कुटुंबीय साजरा करीत असत.

श्री. शांतारामपंत वाकडे हे गावातील भारदस्त व्यक्तीमत्त्व आणि जमीनदार. त्यांच्याकडे बंदुकीचा परवाना होता. गणेश जयंती उत्सवात दुपारी पूजा झाल्यावर ते मंडपाबाहेर येऊन बंदुकीचा बार उडवायचे, तेव्हा आजूबाजूच्या परिसरात गणेश जन्म झाल्याचे कळत असे.

गावात तशी सुबत्ता होती. समाज सधन, जमीनदार, पांढरपेशी मध्यम वर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या साधारण असा त्रिभागलेला होता. शासकीय वा अशासकीय नोकरीतले बहुतेक जण विमा कंपन्या, शिक्षक, कारकुनी, छापखाने अशा सेवेतच असायचे. घरटी एक-दोन तरी नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने मुंबईत होते. नव्याने सुरू झालेली एसटी सेवा गावापर्यंत पोहोचली नसल्याने, गावांतील मंडळी आठवडाअखेर बोटीने गावी येत असत. समाजातला एकोपा वाखाणण्याजोगा होता. गावातल्या लग्न, मुंजी समारंभांची सर्वांना आमंत्रणे असायची. संकट प्रसंगीही समाज एकत्र येत असे. याचे एक ठळक उदाहरण म्हणून सांगतो. ऐन तारुण्यात एका स्त्रीच्या पतीचे निधन झाले. लहान मुले, गाईगुरे आणि शेतीचा व्याप सांभाळता सांभाळता ती जेरीस आली आणि त्यादरम्यान शेतसारा भरू शकली नाही. त्यामुळे जमिनीवर जप्तीचा आदेश काढला गेला. जप्तीचा हुकूम देणाऱ्या अधिकाऱ्याने तिच्या घरी येऊन जप्तीच्या आदेशावर कार्यवाही करण्याबाबत मोहोर उठविण्यापूर्वी सांगितले की, 'मी सर्व परिस्थिती पाहिली आहे; पण हुकमाला बांधलो आहे. आपण सारा आणि दंड भरण्याची काही व्यवस्था करू शकलात, तर मी हुकूम मागे घेऊ शकेन.' तोपर्यंत ग्रामस्थ जमा झाले होते. अशा वेळी एक सद्‌गृहस्थ पुढे आले. त्यांनी सर्व रक्कम भरली. काही दिवसांनी त्या महिलेने आपली दुभती गाय विकून ते पैसे फेडले.

गावातल्या सर्व घरी पौरोहित्याचे काम श्री. अनंत भागवत यांच्याकडे असायचे. आम्ही त्यांना आदराने 'आप्पा भटजी' म्हणायचो. घरातले नैमित्तिक उत्सव गौरी, गणपती, सत्यनारायण पूजा आणि लग्न मुंजी अशा सर्व प्रसंगी त्यांची उपस्थिती असायचीच; पण कथा-किर्तनातही ते सहभागी असायचे. काही वर्षांपूर्वी मी रामनवमीच्या उत्सवाला गेलो होतो, तेव्हा अप्पा भटजींचे चिरंजीव श्रीरामाच्या पालखीची सजावट करत होते. मी सहज त्यांच्या घरी गेलो. माझा परिचय करून दिल्यावर थोड्या गप्पागोष्टी झाल्या. त्या घरात पूर्वी अन्य कुटुंब असताना लहानपणी वावरलो असल्याने समोरच्या झोपाळ्याकडे पाहताक्षणी मी भूतकाळात गेलो आणि लक्षात आले, की भागवत कुटुंबीयांनी त्यांची परंपरागत जीवनशैली अगदी त्या झोपाळ्याच्या मधूर ध्वनीसह जपली आहे. गावात भाद्रपदातील गणेश उत्सवही मोठ्या प्रमाणात होत असे. दीड दिवस, पाच दिवस किंवा एकत्रितपणे जाणारे गौरी-गणपती जवळजवळ सर्व घरांत असायचे. गावात वीज नसल्यामुळे तिन्हीसांज होण्यापूर्वी अंबा नदीवर सामूहिक आरती झाल्यावर विसर्जन होत असे. मला आठवते, एकदा सोळा गणपतींची सामूहिक आरती झाल्यावर विसर्जन झाले होते.

नाट्यप्रेम ही मराठी माणसाची मुख्य सांस्कृतिक ओळख. त्याला बांधण अपवाद नव्हते. पोयनाड येथे श्री. जोशी यांचे श्रीकृष्ण थिएटर होते. पावसाळा संपल्यावर थिएटर सुरू व्हायचे. नाट्य मंचाच्या समोर वादकांच्या मागे मध्यभागी आयताकृती खोदकाम करून त्यामध्ये खुर्च्यांची व्यवस्था असायची. त्यांच्या तिन्ही बाजूला पीटात जाजम अंथरून बसायची व्यवस्था असायची. गावात वीज नसल्याने पैट्रोमॅक्सचे दिवे नाट्यमंचावर असायचे. माझ्या आठवणीत मी सर्व नाटके पीटात बसून पाहिली होती. गावात एखादी नाटक कंपनी आली, की बैलगाडीतून ढोल-ताशांच्या गजरात घरोघरी छापील जाहिराती वाटल्या जायच्या. गावातील हौशी नाटक कलाकार ही नाटके बसवायची. मला आठवते, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या जीवनावरील नाटकात आप्पा भागवतांनी फौजदाराची भूमिका केली होती.

सर्कस पाहाणे हाही मराठी समाजाचा त्या काळातला एक आवडता छंद! कोकण परिसरात लहान सर्कशी होत्या. त्यातील शिंदे, ताराबाई या सर्कशी प्रसिद्ध होत्या. दिवाळी झाली, की पेझारीच्या शेताडीत सर्कशींचा पंधरा-वीस दिवस मुक्काम असायचा. रिंगणाच्या बाहेर अर्धवर्तुळाकार खुर्च्या व दुसऱ्या बाजूला पिटात जाजमावर बसायची व्यवस्था.

The Board of Trustees of the Temples, Charitable Institutions and Funds of the Goud Saraswat Brahman Community of Mumbai
Popularly Known as

(Estd : 1879) (स्थापना : १८७९)

**Goud Saraswat Brahman Temple Trust**
Shree Balaji Ramji Mandir Buillding, Second Floor,
41-47, Bhuleshwar Road, Mumbai 400 002

**गौड सारस्वत ब्राह्मण टेंपल ट्रस्ट**
श्रीबालाजी रामजी मंदिर बिल्डींग, दुसरा मजला,
४१-४७, भुलेश्वर रोड, मुंबई ४०० ००२

Tel.: 022-2240 4482* Public Trust No. A558 B* E-mail : gsbtempletrust@gmail.com*Mahim Office : Tel. : 022-24446956



# जी एस बी टेंपल ट्रस्ट, मुंबई (स्थापना - १८७९)

# (मुंबईतील सर्वात जुना देवालयांचा ट्रस्ट)

## ट्रस्टच्या अधिपत्याखालील देवालये

(१) शितळादेवी, माहीम परिसरातील शांतादुर्गेच्या देवालयासह काही देवालये.
(२) मुरलीधर मंदिर, माहीम. (३) श्रीवालुकेश्वर मंदिर, बाणगंगा.
(४) श्रीभुलेश्वर मंदिर, भुलेश्वर (५) श्रीबालाजी रामजी मंदिर, भुलेश्वर.
बाणगंगा तलावही जी एस बी टेंपल ट्रस्टच्या मालकीचा आहे.

## ट्रस्टचे उपक्रम

(१) सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यात येते.
(२) सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या गरीब रुग्णांना हॉस्पिटलाच्या खर्चाची काही प्रमाणात भरपाई देण्यात येते.
(३) धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा (राजकीय संघटना वगळून) अन्य सर्व संघटनांना आर्थिक मदत देण्यात येते.
(४) गरजू व गरीबांना आर्थिक मदत देण्यात येते.
(५) गरजू संस्थांना तांदूळ व साडी वाटप करण्यात येते.
(६) कोरोना बाधित रुग्णांना फार मोठ्या प्रमाणात ट्रस्टने आर्थिक मदत केली आहे.
(७) कोरोनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या बऱ्याच व्यक्तींना ट्रस्टने आर्थिक मदत केली आहे.
(८) नैसर्गिक आपत्तीत सापडणाऱ्या संस्था व व्यक्तींना ट्रस्ट आर्थिक मदत करते.
(९) कुटुंबियांचे देव - ज्या सारस्वत ब्राह्मण कुटुंबांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांमुळे त्यांच्या घरातील (गावातील किंवा मुंबईतील) देवांची दररोज पूजा करणे जमत नाही किंवा शक्य होत नाही असे विविध कुटुंबांचे देव हा ट्रस्ट स्वीकारतो. हे देव ठेवण्यासाठी खास सोय असून या देवांची ट्रस्टच्या पुजाऱ्यामार्फत रोज यथासांग पूजा केली जाते. यासाठी ट्रस्टच्या भुलेश्वर येथे मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.
(१०) धर्मशाळा- आपल्या ट्रस्टच्या मालकीची मरीन लाईन्स (पूर्व) चंदनवाडी येथे धर्मशाळा असून येथे ज्ञातीतील तसेच ज्ञातीबाहेरील व्यक्तींचे निधनानंतरचे नववे, दहावे, अकरावे, बारावे व तेरावे हे विधी करण्याची सोय आहे.

**प्रविण कानविंदे**
अध्यक्ष

**शशांक गुळगुळे**
मानद सचिव व कायम विश्वस्त

**अनिल परुळकर**
कायम विश्वस्त

**कल्पना प्रभू**
मानद खजिनदार

पालकांबरोबर लहान मुले दिसली की, 'बच्चे कंपनी को तिकीट नाही' असे बोलून प्रेमाने धपका मारून आत सोडले जायचे. सर्कशी लहान असल्याने दिवसा शिकारखाना पाहाताना राहुट्यातील सर्कसपटूही दिसत असत.

संतती आणि संपत्ती एकत्रित नांदत नाही, असे म्हणतात. बांधण गावही त्याला अपवाद नव्हते. एखादाच अपवाद असायचा. याबाबत मी एक गमतीची गोष्ट सांगतो. गौड सारस्वत सहकारी पतसंस्थेचा अध्यक्ष असताना एक गृहस्थ पत्नीसह कर्जरोखा भरण्यासाठी आले होते. अर्ज भरताना ते सहज म्हणाले, 'तुम्ही माझ्या पत्नीला ओळखत असाल, ती बांधणची आहे.' मी तिच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहून नाव विचारले. तिने नाव सांगितल्यावर मी तिच्या एका बहिणीचे नाव सांगून 'ती माझ्या वर्गात होती' असे म्हणालो. तेव्हा तिने विचारले की, 'तुम्ही बांधणला केव्हा होता?' यावर मी १९५२ पर्यंत बांधणला होतो, त्यानंतर मुंबईला आल्याचे सांगितले. ती थोडी लाजूनच म्हणाली, 'काका, माझा जन्म १९५५चा आहे. हे ऐकल्यावर 'कमा', 'सुमा', 'आरू', 'चंदू' आपल्याभोवती फेर धरून नाचत असल्याचा भास झाला.

गावात जमीनदारांचे स्थान तसे वरचे होते. त्यामुळे त्यांच्या घरचे समारंभ वाजतगाजत होत असत. लग्न मुंजीचे आमंत्रणही यजमान ढोल-ताशांच्या गजरात बैलगाडीतून सपत्नीक येऊन करायचे. एखाद्या घरासमोर वाजंत्र्यांचा गजर झाला, की घरातील प्रमुख व्यक्ती कोट-टोपी अशा विशेष पेहरावात स्वागताला बाहेर यायची. एखाद वेळी त्यात अहंभावही जागृत व्हायचा.

एकदा एका गृहस्थांनी घरातल्या मुंजीचा समारंभ फक्त जवळच्या नातलगांना आमंत्रण देऊन थोडक्यात केला होता. त्यानंतर दुसऱ्या जमीनदाराकडे काही कार्य निघाले. प्रथेप्रमाणे ते आमंत्रणासाठी वाजतगाजत निघाले, त्या गृहस्थांच्या आजूबाजूच्या घरात त्यांनी आमंत्रणे केली आणि त्या गृहस्थांच्या घराबाहेर बराच वेळ वाद्ये वाजवून पुढे निघून गेले. इंग्रज राजवटीत एक जमीनदार इंग्लडला गेले होते. त्यांनी तेथे आपली ओळख 'ड्युक ऑफ पोयनाड' अशी दिली. ते सांगत असत की, 'मी इंग्लंडच्या राणीला भेटून आलो.'

त्याकाळी मुलगी १४/१५ वर्षांची झाली, की पालक तिच्यासाठी स्थळ बघायला सुरुवात करायचे. मला आठवते, मी पहिलीत असताना माझ्या नातेवाईकांच्या दोन भाच्या (आतेमामे बहिणी) शाळेत चौथीत होत्या. त्या १३/१४ वर्षांच्या असाव्यात. पहिलीची मुले शिक्षकांच्या समोरच जमिनीवर बसलेली असायची. त्यात मीही होतो. एकदा त्या दोन्ही मुली शिक्षकांच्या टेबलाजवळ आल्या आणि म्हणाल्या, 'मास्तर, आमचे लग्न जमले आहे. आम्ही सोमवारपासून शाळेत येणार नाही.' त्यांच्या निरागस चेहऱ्यावर आनंद, संकोच असे कोणतेही भाव नव्हते.

पोयनाड येथे सोमवारी आठवडा बाजार भरत असे. साधारण हिवाळ्यात सुगीचे दिवस सुरू झाल्यावर बाजार भरायला लागायचा. तो मेअखेरपर्यंत चालू राहायचा. धान्य, कडधान्ये, मसाल्याचे पदार्थ, अलिबागचे प्रसिद्ध कडवे वाल, सफेद कांदे अशा सर्व किराणा मालापासून थेट सुक्या मासळीपर्यंत वार्षिक साठवणीच्या सर्व वस्तू उपलब्ध असत. बाजारपेठेत सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर माल येत नसे. त्यामुळे बाजारात अडत्यांचा (एजंट) प्रवेश होण्यापूर्वी साठवणुकीच्या वस्तू घेण्यासाठी महिलांची लगबग असायची. त्याकाळी सामान बैलगाडीतून आणले जायचे. खपाच्या वाडीच्या मागे मोकळी जागा होती. तिथे सर्व गाड्या उभ्या करून बैलांना चारापाण्यासाठी सोडले जायचे. शंकराच्या देवळाजवळ बाजारपेठेसमोर बैलगाडीच्या धाव (लोखंडी चाक) बसविण्यासाठी लोहाराची भट्टी चालू असायची. काळुराम पाटलाकडील भजी आणि धोंडू जंगमाकडील चहा घेतल्यावर बाजारहाटाची सांगता व्हायची.

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी घराघरांत स्वातंत्र्याबाबत चर्चा होत असत. सर्वांचा सूर साधारणतः एकच असायचा. काँग्रेसमुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले. १९५२ला भारतात प्रथम सार्वत्रिक निवडणूक झाली, तेव्हा कुलाबा जिल्ह्यात मुख्यतः अलिबाग तालुक्यात काँग्रेस, शेकाप, समाजवादी आणि कम्युनिस्ट असे चार पक्ष होते. कुलाबा जिल्ह्यात काँग्रेस व शेकापचा विशेष जोर होता; पण सर्वत्र काँग्रेसचे वातावरण होते. अलिबाग मतदार संघामध्ये श्री. द. का. कुंटे मुंबई इलाखा विधानसभेच्या आमदार पदासाठी उमेदवार होते. कुलाबा जिल्ह्यात श्री. चिंतामणराव देशमुख हे लोकसभेसाठी उमेदवार होते. पंडित जवाहरलाल नेहरूंची सभा धरमतर येथे झाली. माझे बंधू त्या सभेला गेले होते. अक्षरशः लाखोंचा जनसमुदाय नेहरूंच्या सभेला उपस्थित होता. त्यावेळी 'धरमतर येथे खाडीवर पूल बांधण्यात येईल', अशी घोषणा करण्यात आली. पुढे यथावकाश ती पूर्णही झाली. दोन्ही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले. श्री. कुंटे विधानसभेचे सभापती झाले, तर श्री. चिंतामणराव देशमुख केंद्रीय अर्थमंत्री झाले.

प्रत्येक भाषेची काही वैशिष्ट्ये असतात. ती स्थान आणि कालपरत्वे बदलतात. आज कालबाह्य झालेले बांधणमधील काही शब्दप्रयोग मला आठवतात. 'गुदस्ता' म्हणजे गेल्या वर्षी, 'तिगस्ता' म्हणजे दोन वर्षांपूर्वी. उदाहरणार्थ, गुदस्ता पाऊस कमी झाला. तिगस्ता मोठे वादळ झाले होते.

ग्रामीण भागात पुढील वर्षासाठी ज्वारी, बाजरी, तांदूळ, वाल वा तत्सम कडधान्ये, मसाल्याचे पदार्थ, जळणासाठी लाकूडफाटा आदी साठवणीच्या वस्तू पावसाळ्यापूर्वी खरेदी करून ठेवायची पद्धत होती. त्याला 'आगोठीची बेगमी करणे' असे म्हणत असत. एखाद्या प्रौढ बाईचे दुसऱ्या बाईशी भांडण झाले, तर ती 'मी तिची चांगली कवाडी काढली' असे म्हणायची.

बांधणला एक शिक्षकी शाळा होती. तेथेच मी तिसरीपर्यंत होतो. त्याशिवाय पोयनाडला सातवीपर्यंतची व पेझारीला इंग्रजी शाळा होती. मी १९४९ला पहिलीत शाळेत गेलो, तेव्हा 'जन-गण-मन' गीताचा राष्ट्रगीत म्हणून स्वीकार झालेला नव्हता. सुरुवातीची एकदोन वर्षे विद्यार्थी 'वंदे मातरम्' आणि'विश्व विजयी तिरंगा प्यारा। झंडा ऊंचा रहे हमारा।' हे हिंदी गीत गात असत. २६ जानेवारी १९५० ला भारत प्रजासत्ताक देश म्हणून जाहीर झाला, त्यावेळी शालेय मुलांना खाऊसाठी पैसे वाटले होते. आमच्या शाळेत मुलांना प्रत्येकी पाच आणे मिळाले होते. त्या काळात पावसाळ्यात दुर्गम रस्ते बंद असायचे आणि शेतीची कामेही असायची. म्हणून शाळेचे नवीन वर्ष मे महिन्यात सुरू व्हायचे. मी चौथीत गेलो आणि महिनाभर शाळेतही गेलो. तेव्हा ध्यानीमनी नसताना शेवटी तो दिवस उजाडला. मुंबईला माझी मामी निवर्तली होती आणि बंधूंचे आजारपण हे निमित्त झाले. सर्व कुटुंब रविवार दिनांक १ जून १९५२ला पुन्हा मुंबईला आले.

१४ जूनला शाळा सुरू झाल्या. नुकतीच चौथी पास झालेली माझी मामेबहीण वाडीतल्या शाळेतून जवळच्या मुलींच्या शाळेत गेली होती. ती मला बरोबर घेऊन वाडीतल्या शाळेच्या मुख्याध्यापिकांना भेटली आणि म्हणाली, 'बाई, माझ्या भावाचे नाव शाळेत घालायचे आहे.' बालमूर्ती पाहून बाई म्हणाल्या, 'त्याला बाजूच्या वर्गात बसव! मी नंतर त्याचे नाव घालते.' तेव्हा बहीण थोडी रागावल्यासारखे करून म्हणाली, 'नाही बाई, माझा भाऊ चौथीत आहे.' बाई परत माझ्याकडे पाहून म्हणाल्या, 'बरं! त्याला भावे गुरुजींच्या वर्गात बसव.' त्या दिवशी माझा खऱ्या अर्थाने बांधणचा संबंध तुटला.

- लेखक हे शिक्षण व समाज कल्याण विभाग,
मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथून प्रथम श्रेणी अधिकारी
म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत.
संपर्क - ९८६९२०८६४५

## वाचकांना व वर्गणीदारांना आवाहन, आश्रयदाते-आधारस्तंभ व्हा !

'सारस्वत चैतन्य' त्रैमासिकास आता ३८ वर्षे पूर्ण झाली आहेत. दर अंकागणिक सारस्वत चैतन्यचे स्वरूप अधिकाधिक आकर्षक करण्याचा संपादक मंडळाचा प्रयत्न राहिला आहे. सारस्वत चैतन्य त्रैमासिक व अन्य उपक्रम यासाठी निधीची आवश्यकता आहे. म्हणून आम्ही सर्व विद्यमान वर्गणीदार व देणगीदारांना आपली प्रतवाढ करण्याचे आवाहन करीत आहोत. आश्रयदाते, आधारस्तंभ व्हा आणि संस्थेची आर्थिक बाजू बळकट करा. तसेच शुभेच्छा किंवा स्मृतिप्रीत्यर्थ देणगी पाठवून संस्थेच्या कार्यास हातभार लावावा. आश्रयदाते व आधारस्तंभ यांची नावे दर अंकात छापण्यात येतात. (अधिक माहितीसाठी वर्गणी देणगी फॉर्म निवेदन पाहावे.) आमच्या पूर्वीच्या आवाहनाला अनेकांनी मनापासून पाठिंबा दिला आहे. त्याबद्दल देणगीदारांना धन्यवाद, या आवाहनालाही आपण असाच उत्स्फूर्त प्रतिसाद द्याल, अशी खात्री आहे. देणगीदारांची नावे खाली प्रसिद्ध करीत आहोत. यानंतरची नावे पुढील अंकात छापण्यात येतील. सर्व देणगीदारांचे आभारी आहोत.

**- विश्वस्त मंडळ, सारस्वत प्रकाशन विश्वस्त संस्था**

**आधारस्तंभ (व्यक्ती)**

- संतोष नाईक, गोरेगाव, मुंबई : रु. १०,०००/-

**आश्रयदाते (व्यक्ती)**

- हर्षद अशोक देसाई, गिरगाव, मुंबई : रु. ६०००/-

# कल्पनाविलास आणि वास्तव



पुष्पा सामंत

**सत्य म्हणजेच शाश्वत परम सत्य होय. फक्त कल्पना आणि वास्तव ह्यातील भेदाभेद जाणण्यासाठी अतिसूक्ष्म संवेदनाशील मन पाहिजे, तरच दोघांमधील भेदाच्या शंकेचं निरसन होऊन, क्षीर-नीर ह्या मधील भेदाप्रमाणेच, स्थूल आणि सूक्ष्मातील भेदाभेद स्पष्ट होतो...**

कल्पना करणं आणि वास्तव ह्यामध्ये जमीन-अस्मानचा फरक आहे. मनातल्या वृत्तीविचारांतून कल्पना जन्म घेते. विचार सतत बदलत राहतात. त्यामुळे विचार येतो आणि जातो; पण वास्तव म्हणजेच सत्य हे बदलणारं नसतं, त्याला जन्मही नाही. त्यामुळे त्याला मृत्यूही नाही. सत्य म्हणजेच शाश्वत परमसत्य होय. फक्त कल्पना आणि वास्तव ह्यातील भेदाभेद जाणण्यासाठी अतिसूक्ष्म संवेदनशील मन (आत्मबोध) पाहिजे, तरच दोघांमधील भेदाच्या शंकेचं निरसन होऊन, क्षीर-नीर ह्यामधील भेदाप्रमाणेच, स्थूल आणि सूक्ष्मातील भेदाभेद स्पष्ट होतो.

आपल्या जवळच्या नात्यात बाळ जन्माला आलं, की जोपर्यंत आपण प्रत्यक्ष त्या बाळाला पाहत नाही, तोपर्यंत त्या बाळाच्या रूपाविषयी, रंगाविषयी किंवा त्याच्या एकंदरीत दिसण्याविषयी जवळची व्यक्ती आपापल्या कल्पनेनुसार आपल्या मनात त्याची प्रतिमा रंगवत असते. मात्र बाळाला जेव्हा पहिल्यांदा पाहिले जाते, तेव्हा आपण केलेल्या कल्पनेहून बाळाचं प्रत्यक्ष रूप काही वेगळंच असतं, हे त्याक्षणी लक्षात येतं. तसंच काहीसं प्रत्यक्ष अनुभूती न घेता, परमात्म्याविषयी कल्पनाचित्र रंगवून प्रत्येकजण कायाचक्षूद्वारा आपापल्या मतीनुसार



परमात्म्याचं चित्र चितारत असतात. बऱ्याचवेळा त्यामागील चुकीच्या रूढीपरंपरांच्या जुनाट संस्कारांच्या ओझ्यामध्ये अडकल्यामुळे आणि ते झिडकारून लावण्याचं धाडस नसल्यामुळे, परमेश्वराविषयी चुकीच्या कल्पना बाळगून, आत्मबोधाविषयीच्या अज्ञानामुळे, अहं पोसण्याचे काम आपण करत असतो.

परमेश्वर ही काही दाखविण्याची किंवा वर्णन करण्याची वस्तू नाही, तर ती आत्मानुभूती आहे. ज्ञानाच्या ज्या ज्या स्तरावर जीव असतो, त्यानुसार त्या त्या स्तरावर त्याचा अनुभव असतो. परमेश्वर ही परमचेतना आहे. जीव आणि आत्मा हा एकाच शरीरात असला, तरी जिवाला प्रकृतीच्या गुणांनुसार कर्म करणे भाग आहे. त्यामुळे जिवाला बंधन आहे; परंतु आत्मा हा कर्मरहित बंधनरहित आहे. द्वैतात 'मी-तू' सगुण भक्ती केली जाते; परंतु द्वैताच्या परे 'अद्वैत' एक आहे. तेथे निर्गुण निराकार परब्रह्म आहे. साधक जेव्हा प्रथम अवस्थेत (अध्यात्म) असतो, तेव्हा सगुण भक्तीद्वारा तो आपल्या इष्टदेवतेच्या मूर्तीची पूजा करतो. हिंदूंच्या तेहतीस कोटी देव-देवतांपैकी एखाद्याचं दैवत श्रीगणेश, भगवान महादेव, श्री हनुमान, श्री दुर्गा कोणतंही असू शकतं. ह्या मार्गाने पूजा करणाऱ्या भक्ताला 'अध्यात्मात भक्तीमार्ग' असे संबोधले जाते; परंतु सकाम भक्तीपेक्षा 'निष्काम भक्ती' ही सर्वश्रेष्ठ आणि विहंगम मार्गाने जाणारी भक्ती ठरते. निष्कामतेमध्ये द्वैत नाहीसं होऊन केवळ अद्वैत राहतं. एखादी व्यक्ती बसने प्रवास करीत असेल आणि दुसरी व्यक्ती स्वतःच्या गाडीने प्रवास करीत असेल, तर एकाच ठिकाणी पोचण्याची वेळ दोघांची वेगवेगळी असते. गाडीवाला बसवाल्यापेक्षा अधिक जलदगतीने आपल्या इच्छीत स्थळी पोचतो. अगदी तसंच सकाम आणि निष्काम भक्तीमध्ये असतं. निष्काम भक्तीमध्ये विहंगम मार्गाने जाता येतं. अर्थात

प्रत्येक जिवाच्या पूर्वसंचित कर्मावर आणि वर्तमान कर्मावर हे फलित अवलंबून आहे. मनुष्य जीवनाचं प्रयोजन हे अंततः जीवनमुक्ती हेच आहे. आत्मबोधाद्वारा जिवाला वर्तमान क्षणात जीवनमुक्ती होते. त्यासाठी मी कर्ता हा अहंभाव (देहभाव) नष्ट होऊन, शरीर, मन, बुद्धीला जाणणारा 'मी देही' अकर्ता आहे, हा भाव सतत वृद्धिंगत झाला पाहिजे.

शरीर मालक होऊन बसलं, की अज्ञान नष्ट न होता, आत्मारामाच्या अनुभूतीपासून आपण दूर राहू. कायाचक्षूद्वारा भौतिकातील मिथ्या जगालाच जीव खरं मानतो. अज्ञानाचा अंधकार नष्ट झाल्याशिवाय, अंतर्यामी असलेला ज्ञानाचा प्रकाश दिसणार कसा? आत्मज्ञान झाल्याशिवाय 'स्वः'चा परिचय होऊ शकत नाही. आत्मज्ञानातून स्वरूपाची ओळख झाली, की त्याक्षणी अज्ञान नष्ट होऊन जीवनमुक्तीचा मार्ग खुला होतो. बुद्धीजीवी व्यक्ती जोपर्यंत आपल्या बुद्धीला शांत करीत नाही, म्हणजेच आपला अहं नष्ट करीत नाही, तोपर्यंत आत्मबोध कल्पनेच्या पलीकडेचं राहील. परमेश्वरापाशी नतमस्तक होणं किंवा शरणागत होणं म्हणजेच, 'हा जीव अज्ञानी आहे, माझी ह्यातून मुक्तता कर' अशी विश्वविधात्याकडे मनापासून प्रार्थना करणं होय. 'कोणाची सत्ता चाले, विचारी मना, तूच शोधून पाहे' अशा अवस्थेत असणाऱ्या जिवाला योग्य मार्ग सापडतो आणि त्याचं जीवन मुक्त होतं.

***

---

## घालमेल

कातरवेळी तिन्हीसांजेला निरोप घेता घेता
जपून ठेवीन आठवणींची सोबत जाता जाता ॥ धृ ॥

मावळतीला सूर्य कोवळा
आठवणींना फुटे उमाळा
मनात भरला लळा जिव्हाळा
पंख लावुनी दिनही उडाले क्षणात बघता बघता ॥ १ ॥

असे घडावे कधी न वाटले
तरीही असे का सारे घडले?
गुज मनीचे कसे न कळले?
मनातल्या मी मनात झुरते काही न उरले आता ॥ २ ॥

आयुष्याची सांजवेळ ही
कशास आता घालमेल ही
झाले गेले विसरुनी तूही
बकूळ फुलापरी गंध प्रीतीचा देशील का एकदा?॥ ३ ॥

**- प्रियंवदा करंडे**
संपर्क : ९९२०२७१०३२

## अंधार दूर गेला

चराचर आनंदले संपला तिमिर
घट्ट दाटला अंधार दूर दूर गेला

साचल्या अंधाराची घट्ट काळोखी मिठी
सारी आशा संपलेली प्राण आले कंठी
कुठून आला कवडसा, सावरून गेला
घट्ट दाटला अंधार दूर दूर गेला

असे काय होते, सारे कसे अंधारते
कडेलोट होता होता, कोण कोणा सावरते
पणती जपून ठेवा, कोण सांगून गेला
घट्ट दाटला अंधार दूर दूर गेला

कधी नष्ट होईल विश्वाचा अंधार
काळ्याकुट्ट सावल्यांचा खेळ कधी सरणार
पसायदान ज्ञानदेव माझा मागून गेला
घट्ट दाटला अंधार दूर दूर गेला.

**- मंगेश मंत्री**
संपर्क : ९३२५४०३२३४



Mohit Bhende

# Global Chamber of Saraswat Entrepreneurs : Navigating Excellence - Highlights from the Finance & Legal Summit 2024

The Finance & Legal Summit 2024 in Mumbai, orchestrated by the Global Chamber of Saraswat Entrepreneurs at Khar Gymkhana, proved to be highly successful, facilitating significant networking opportunities and knowledge exchange among participants. The registration process for delegates unfolded seamlessly, ensuring a smooth commencement of the event.

The inauguration ceremony commenced with a poignant rendition of Saraswati Vandana by Mr. Avdhoot Rege, followed by the solemn lighting of the Holy Lamp, attended by esteemed Chief Guests, Chamber Directors, and other Dignitaries, thereby establishing a harmonious and auspicious ambiance for the gathering. Founder Director Mr. Siddharth Sinkar delivered a stirring introduction to the Chamber, articulating its vision and mission with fervor and lucidity, thereby leaving a lasting impression on all attendees through his insightful discourse.

The keynote address delivered by CA Mahesh Aras, Managing Director of JP Morgan, held the audience spellbound with its profound insights and strategic vision, thereby laying a solid foundation for an enlightening and impactful summit ahead. Mr. Amol Kamat, Principal Commissioner of Income Tax, delivered a compelling address, offering invaluable perspectives and guidance derived from his extensive knowledge and experience, thereby enhancing the summit's discourse. Additionally, Arun Mavinkurve, Vice Chairman of SVC Bank, delivered an inspiring address, sharing invaluable insights and strategies that significantly contributed to the depth and vision of the summit, particularly concerning the future trajectory of banking and finance.

The panel discussion on 'Financing Business Journey – From Traditional to Contemporary Options', which included esteemed panelists such as CA Nagesh Pinge, CA Amit Pandit, Mr. Amit Wagle, Mr. Manguirish Pai Raikar, and CA Balaji Bhatt, was skillfully moderated by CA Abhijit Sanzgiri. His adept moderation ensured a seamless flow of discussion and facilitated the exchange of invaluable insights into the evolving landscape of business financing, thereby





maximizing the engagement and participation of all attendees.

The panel discussion on "Legal Challenges in Doing Business," which showcased distinguished speakers including Senior Adv. Rajendra Pai, Senior Adv. Narendra Walawalkar, CS Atul Juvle, Adv. Ninad Laud, and Adv. Madhukar Dalvi, was expertly moderated by CS Shivprasad Laud. His skillful moderation fostered a comprehensive exploration of legal complexities and solutions crucial for effectively navigating the business landscape, thereby enriching the discussion and providing valuable insights to the attendees.

The address delivered by Chief Guest Dr. Nitin Gokarn, IAS, representing the Government of Uttar Pradesh, was characterized by profound insights and strategic vision, thereby illuminating the summit with perspectives crucial for fostering growth and development. Furthermore, the ceremonial release of the souvenir "Saraswat Connect - Finance & Legal Summit 2024" by the Chief Guest and other dignitaries marked a significant milestone, symbolizing the commemoration of the summit's achievements and the establishment of enduring connections within the finance and legal community.

The felicitations bestowed upon stalwarts from the finance and legal sectors within the Saraswat community served as a tribute to their outstanding contributions, inspiring future generations and fortifying the bonds of solidarity within the community. Additionally, Director Mr. Pravin Kakode from Goa unveiled various new initiatives of the Chamber, demonstrating a forward-thinking approach and a steadfast commitment to innovation in serving the Saraswat community and extending its impact beyond.

Adv. Ishaan Patkar, in his capacity as the Program Lead, delivered a sincere and heartfelt vote of thanks, expressing deep gratitude to all participants, sponsors, and organizers for their invaluable contributions towards the success of the event. His words encapsulated the spirit of camaraderie and collaboration that defined the Finance & Legal Summit 2024, acknowledging the collective effort and dedication that made the summit a resounding suc-



cess.

Mr. Mohit Bhende's exceptional skills as a master of ceremonies elevated the event, as his eloquence and charm seamlessly guided the audience through the program. His ability to maintain an engaging and vibrant atmosphere throughout the event contributed significantly to its success.



The Cocktails & Dinner session provided a delightful opportunity for networking, fostering meaningful connections and conversations amidst a convivial atmosphere, enriching the overall experience of the event.

***

Contact : 9867669451

---

**Elections happened at GSB Seva MANDAL's SHREE Guru Ganesh Prasad hall, Sion, Mumbai for 6 positions**

**Held on 1st April 2024**

**For the period 2024-2026**






The name Dempo is bound-up with Goan history for half a millennium. The Dempos were then renowned for agriculture, trading, imports, and underwriting besides social responsibility.

Today, DEMPO moves ahead, a confident, caring conglomerate, reaping the practice of business tempered with ethics in each of their existing lines of activity, while staying wedded to their core values as they venture into planned lines of Industrial activity, new and emerging businesses. The Group firmly believes in ethical and transparent Corporate Governance which is critical to the long-term success and ability to create value for the stakeholders.

The Group is committed to creating a more sustainable enterprise. Besides business performance, the group also makes significant investments in community engagements through the implementation of various meaningful philanthropic programmes. Corporate Governance and ethical management have always been the guiding principles of carrying out the business at Dempo.

**DEMPO** Group of Companies

Corporate Office : Dempo House, Campal, Panaji - Goa 403 001.
Tel : 0832 - 2226281 / 862441300 / 457
Fax : 0832 - 2225098 / 2228588
E-mail : mail@dempos.com Website : www.dempos.com

Goa Carbon I Devashri Nirman - Real Estate I Dempo Shipbuilding & Modest Infrastructure I Navhind Papers & Publications & Goa 365 I Dempo Travels I Hindustan Foods I Dempo Sports Club I Dempo Charities & Education I Mahamaya Farms I Motown Trading I Mewo Co-working

# संकल्प मासिकाचे अनावरण



Nkgsb co -op. Bank' s house journal named ' SANKALP' relaunched on Monday, 15th april 2024 at bank' s head office at girgaum, mumbai.house journal is launched by bank ' s chair person smt. Heemangi c. Nadkarni. Others seen in the picture are-M.D. of the bank Shri Sunil panse and directors of the board and members of board of management. Sankalp was first in the year 2010 and published till 2019.the present board of directors have decided to relaunch the same after a gap of 5 years.this quarterly house journal will be sent to all the share holders and all the clients of the bank either by email or whatsapp

---

# रायगड जिल्हा सारस्वत स्नेहसंमेलन १२ मे रोजी

'सारस्वत हितवर्धक मंडळा'च्या शताब्दी वर्षानिमित्त 'सारस्वत हितवर्धक मंडळ, मुंबई' आयोजित 'रायगड जिल्हा सारस्वत ब्राह्मण मंडळ अलिबाग' आणि 'रोहा सारस्वत परिवार' यांच्या सहकार्याने रायगड जिल्हा सारस्वत स्नेहसंमेलन रविवार दिनांक १२ मे २०२४ रोजी सकाळी नऊ वाजता मातोश्री मंगल कार्यालय रोहा, रायगड येथे सारस्वत हितवर्धक मंडळाचे अध्यक्ष श्री. सिद्धार्थ सिनकर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ कवी, निवेदक श्री. प्रसाद कुलकर्णी आणि विशेष अतिथी श्री. नित्यानंद कामत यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले आहे. यावेळी स्थानिक कलाकार प्रस्तुत मनोरंजनाचे कार्यक्रम, ज्येष्ठ कवी श्री. प्रसाद कुलकर्णी यांचा एकपात्री मनोरंजनाचा कार्यक्रम 'आनंदयात्रा' आणि श्री. प्रमोद तेंडुलकर यांचे 'सारस्वत संस्थांचा परिचय आणि कार्यप्रणाली' यावर विशेष विवेचन सादर केले जाणार आहे. या समारंभाला आपण सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अशी विनंती वरील संस्थानी सर्व सारस्वत बांधवांना केली आहे. अधिक माहितीसाठी पुढील व्यक्तींशी संपर्क साधावा :

**अशोक तेंडुलकर - ९२७२७४७४७३,**
**प्रवीण वागळे - ९२७००२१९३८,**
**निकेत बागाव - ९०२८६९६३९०.**

**देणगीदार फॉर्म**

# सारस्वत प्रकाशन

(Reg. No. under Bombay Public Trust Act 1950 - E-13364)

१०, सारस्वत भवन, छत्रपती शिवाजी महाराज पथ, (मोगल लेन), माहीम, मुंबई – ४०० ०१६

वेबसाईटचा पत्ता : www.saraswatprakashan.org Email : chaitanyamag@gmail.com

All Donations (Except Cash Donations above Rs. .2000/- ) are eligible for 50% exemption from Income Tax under Sec. 80G of the Income Tax Act, 1961 vide Regn. No. AAGTS6431DF20231 dtd. 28-02-2023 of the Director of Income Tax Exemption, Mumbai valid till 31-03-25 PAN NO. :- AAGTS6431D

कार्यवाह, दिनांक : _____ / _____ / 20 ___

सारस्वत प्रकाशन, मुंबई

मी / आमची संस्था / कंपनी, आपल्या सामाजिक संस्थेच्या उपक्रमासाठी देणगी देत आहे. सदर देणगीचा विनियोग संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी करण्यात यावा ही विनंती.

१. संपूर्ण नाव : ____________________________________________

२. घरचा पत्ता : ____________________________________________

____________________________________________

३. ई-मेल आयडी : ______________________ मोबाईल क्र.: ______________

४. जन्मतारीख : ______________________ गोत्र: ______________

५. कुलदैवत व ठिकाण : ____________________________________________

६. ज्ञातिघटक : ____________________________________________

(माहीत असल्यास – कुडाळदेशकर, भालावलीकर, बारदेशकर, शेणवी, चित्रापूर, राजापूरकर, पेडणेकर, साष्टीकर यापैकी )

७. पॅन कार्ड (आवश्यक) : ____________________________________________

८. देणगी रक्कम : ______________________ श्रेणी : ______________

खालील तीन पैकी कोणत्याही एका प्रकारे आपण देणगी रक्कम अदा केली आहे. .

☐ अ. UPI पेमेंट :- संस्थेचा मोबाईल क्र. **8779758085** किंवा QR कोड वापरून

☐ आ. NEFT :- IFSC कोडसह बँकेचा तपशील वापरून

☐ इ. धनादेश :- **'सारस्वत प्रकाशन'** / **SARASWAT PRAKASHAN** ह्या नावाने धनादेश काढून

Bank Account Details:
**SVC Co-operative Bank Ltd.**
Matunga Branch,
Saving Account no.
**100503130013891**
IFS code : **SVCB0000005**

आपला विश्वासू

सही

टीप : १) नको असलेला मजकूर खोडावा. २) अधिक माहितीसाठी मागील पानावर पाहावे. ३) ८०जी अंतर्गत देणगीदारांना पॅन कार्ड क्रमांक देणे आवश्यक आहे.

# सारस्वत चैतन्य


स्थापना: एप्रिल १९८६

- सकल सारस्वतांमध्ये सुसंवाद साधण्याच्या हेतूने १९८६ पासून कार्यरत संस्था
- दर्जदार सारस्वत चैतन्य त्रैमासिकाचे अव्याहत ३८ वर्षे प्रकाशन.
- मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे २००३, २००४ साली उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून पुरस्कार.
- २०१० नंदा फाऊंडेशन पुरस्कार
- १९९४ **'गौड सारस्वत परिचय'** ग्रंथ प्रकाशन.
- १९९६ मुंबईत एक दिवसाचे जी. एस. बी. संमेलन संपन्न
- २००३ 'सारस्वत भातीय संस्कृतीचे उपासक"- गो. म. लाड लिखित पुस्तकाचे प्रकाशन
- २००० सालापासून सातत्याने सारस्वत चैतन्य गौरव सोहळ्याच्या यशस्वी आयोजनातून कर्तुत्ववान सारस्वत व्यक्तींचा सन्मान

## या सामाजिक उपक्रमात देणगीदार म्हणून सहभागी व्हा व 'सारस्वत चैतन्य' त्रैमासिक तहाहयात घरपोच मिळवा.

| देणगीदार : | आधारस्तंभ | आश्रयदाता | हितचिंतक | गौरव सोहळा |
|---|---|---|---|---|
| **व्यक्ती** | ₹ १०,००० | ₹ ६,००० | ₹ ३,५०० | **₹ २५,०००** |
| **संस्था** | ₹ २०,००० | ₹ १२,००० | - | - |
| **कुटुंब * / स्मृत्यर्थ *** | ₹ २०,००० | ₹ १२,००० | - | - |

- एखाद्या व्यक्तीच्या स्मृतीप्रीत्यर्थ तिच्या नावाने कुटुंबीयांनी देणगी दिल्यास त्यांना **'कै. ___ यांचे कुटुंबीय'** किंवा **'सौ. व श्री. ____ आणि कुटुंबीय'** अशा नावाने **'सारस्वत चैतन्य'** त्रैमासिकाचे आधारस्तंभ / आश्रयदाते होता येईल.
- व्यक्ती या देणगीदार प्रकारातील आधारस्तंभ, आश्रयदाता यांची नावे सदरील व्यक्ती हयात असेपर्यंत अंकात छापली जातील.
- संस्था व कुटुंब (स्मृत्यर्थ ) आधारस्तंभ, आश्रयदाते या देणगीदार प्रकारातील नावे अंकात कायम स्वरूपात छापली जातील.
- सर्व देणगीदारांची नोंद एक अंकात घेतली जाईल.
- देणगीदारांना **'सारस्वत चैतन्य'** त्रैमासिकाचा अंक तहहयात पाठविला जाईल.
- याबरोबर पूर्वीच्या तहहयात वर्गणीदारांनी (₹ २००/- वा ₹ २५०/- इत्यादी दिलेल्यांनी) वरीलप्रमाणे देणगी देऊन सहकार्य करावे.
- या व्यतिरिक्त शुभेच्छा देणगी / स्मृतीप्रीत्यर्थ देणगी या अन्य कोणत्याही कार्यासाठी दिलेल्या देणगीच स्वीकार केला जाईल. सादर देणगीचा उल्लेख ज्या अंकात प्रसिद्ध केला जाईल त्याची प्रत देणगीदाराला पाठविली जाईल.


WHO GMP CERTIFIED • ISO 9001:2015 & ISO 13485:2016 CERTIFIED
ENTOD
SINCE 1977
A Speciality Pharmaceutical Wellness Company like No other
"We strive for a day when our innovations will take us beyond traditional symptomatic therapeutics. And that day, there will be no medicines; only prophylaxis, diagnosis and cure"
- Late G.V. Masurkar
Founder
Experts in Ophthalmic, ENT & Paediatric Pharmaceutical Wellness
Over 130 Commercially Available Finished Products
International Formulation R&D Centres
Patient-Centred Innovations since 1977
Scan QR Code:
ENTOD PHARMACEUTICALS LTD
Head Office: Ashirwad Building, S.V.Road, Opp. Badi Masjid, Bandra (W), Mumbai-400050.
Tel.: (+91) 22 – 26423608/ 22-226442052 Fax.: (+91) 22-26441056
E-mail: feedback@entodpharma.com • www. entodinternational.com
Part of
Entod
INTERNATIONAL

**SVC CO-OPERATIVE BANK LTD.** (Multi-State Scheduled Bank) ESTD.1906

(Formerly The Shamrao Vithal Co-op Bank Ltd.)

117 YEARS OF TRUST




**SVC Co-operative Bank Ltd.** is known for offering personalised banking services since 1906. We, at SVC Bank, are proud of our people-first culture and we strive to retain it, helping our staff to strike the right balance between work and life. So, if you are looking for a happy work environment coupled with career growth, you may want to look at some of the opportunities, mentioned here.

SVC Bank is one of the oldest and most recognized names in the country's co-operative banking space, and remains the only multi-state scheduled bank within the Nation having a presence across 11 states with 198 branches. With a total business of over INR 35,000 crores in F. Y. 2023-24, it has proven its robust and strong fundamentals. While SVC Bank prides itself on its people skills and its large customer base, it is best known for its honest and strong relationships that it maintains with both, its customers and its employees.

We are looking for professionals having relevant experience, for the following positions in the Banc.

## CURRENT OPENINGS

**CHIEF MANAGER**
Premises and Development - Mumbai

**BRANCH MANAGER**
Mumbai

**MANAGER/ASSISTANT MANAGER**
Institutional Sales (T. A. S. C.)
Mumbai, Pune & Bengaluru

**ASSISTANT MANAGER**
Content Writer - Marketing and Corporate Communications - Mumbai

**ASSISTANT MANAGER**
Procurement (I. T.) - Mumbai

**MANAGER/ASSISTANT MANAGER**
Small Enterprises Group (S. E. G.) - Sales
Mumbai

Interested candidates may apply by sharing their updated resumes to **careers@svcbank.com** and mentioning the position they are applying for.


Working Capital.
Letter of Credit / Bank Guarantee.
Asset Backed Loans for Business Growth & Expansion.
Feature-rich Current Account with NetBanking Facility.
Export / Import Finance & Forex.
QUICK
MSME SOLUTIONS
for a Rising India
#Haipossible!
*T&C apply.
SVC CO-OPERATIVE BANK LTD.
(Multi-State Scheduled Bank)
ESTD.1906
HUM SE HAI POSSIBLE
(Formerly The Shamrao Vithal Co-op Bank Ltd.)
Visit Branch or Call 24X7 on
1800 313 2120
SVCBankIndia
svc-bank
SVC_Bank
svc_bank
svcbank.com

Registrar of Newspapers, New Delhi
SARASWAT CHAITANYA
Regd. No. : 46921/87
Posted At- Mumbai Patrika Chanel
Sorting Office Mumbai - 400 001




Printed & Published by Rahul Ramkrishna Sakhalkar, for Saraswat Prakashan, Saraswat Bhavan, 2nd floor, Room no. 10, Chhatrapati Shivaji Maharaj Road ( Mogal lane), Mahim ( West), Mumbai -400016 Printed at New Rajkamal Printing Press, 305 Retiwala Industrial Estate H. A. Palav Road, Byculla (East), Mumbai -400027
Editor - Sudhakar Vasant Lotlikar ●year 39 ●Issue 1 ● April-June 2024 ●Pages 52 ●Price 20 Rupees